म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ४५०
१०३०

वा.

१०३०
८/८/३२

# सचित्र-खंडकाव्य.

REFBK-0004249
REFBK-0004249

लेखक
दु० आ० तिवारी.

९८८०
अं. क्र. १०३९

## या पुढील

### काव्यकिरण मालेचा १० वा किरण

# शिवराज-भूषण

हा २५० क्रौन पृष्ठांचा सचित्र अलंकारिक ग्रंथ प्रसिद्ध होणार. शिवछत्रपतींच्या दरबारीं 'भूषण' म्हणून जो हिंदी महाकवि होता त्यानें छत्रपतींवर हिंदींत अलंकारिक काव्यग्रंथ लिहिला आहे त्याचें तिवारी कवींनीं हें मराठी काव्यात्मक रूपांतर केलें आहे.

हा ग्रंथ इतका महत्वाचा व सुंदर आहे कीं औंधचे राजे श्रीमंत बाळासाहेबपंत प्रतिनिधि यांनीं या ग्रंथास प्रकाशनापूर्वी १०० शंभर रु. देणगी दिली आहे.

मि० का० भोरटके

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. ८२४९

॥ ॐ नमश्चंडिकायै ॥

काव्यकिरण-माला किरण १ वा.

# नन्दिनी.

सचित्र

(खंडकाव्य)

सं.का 903६
6-8-32

लेखकः-

दु. आ. तिवारी-जळगांव.

संपादक व प्रकाशक

भि. का. भोरटक्के, जळगांव.

REFBK-0004249
REFBK-0004249

-- मुद्रक --

एन्. एम्. नेमाडे

श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेस, जळगांव.

मार्च १९३०

किंमत ०८

ग्रंथकर्त्यांनें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रकाशकाचें निवेदन.

नन्दिनी हें खंडकाव्य काव्यकिरणमालेचा ९ वा किरण ह्मणून प्रसिद्ध होत आहे.

पहिले ८ किरण जसे कवि तिवारी यांचे होते तसा हाही किरण त्यांचाच आहे. ही माला अजून पूर्ण झाली नाहीं तोंच आजवर प्रसिद्ध झालेल्या किरणांच्या दुसऱ्या आवृत्त्या काढाव्या लागत आहेत यावरूनच त्यांची उज्वलता सिद्ध होत आहे. कांहीं किरण मुंबई व नागपूर सरकारनें बक्षिसें व लायब्ऱ्याकरितां मंजूर केले तर कांहींना दक्षिणाप्राइझ कमेटी--पुणें व ग्रंथोत्तेजकमंडळ--इंदूर या सन्मान्य संस्थांचीं बक्षिसें मिळालीं ही आनंदाची व समाधानाची गोष्ट होय.

प्रस्तुत खंडकाव्याचें रम्य कथानक, त्यांतील नायक नायिकांचे स्वभावपरिपोष, निसर्गाचीं मनोहर वर्णनें आणि युद्धाचे घनघोर प्रसंग वाचून कवि तिवारींच्या आजवरच्या लौकिकास साजेशीच त्यांची ही काव्यकृति उतरली आहे असें कोणाही सद्रसिकास वाटल्यावांचून राहणार नाहीं.

या खंडकाव्यांत पांच चित्रें घालून तें सचित्र करण्यांत आलें. इतर किरणांहून हें याचें वैशिष्य आहे. नन्दिनी खंडकाव्य सचित्र करून तें आकर्षक केलें, ही आम्ही आमच्या वाचकवर्गाची सेवा केली परंतु कवि तिवारी यांनीं मात्र आमच्या पूज्य पित्यास ही सुंदर काव्य--कलिका अर्पण करून आपल्या आत्मीयतेनें आह्मास ऋणी केलें.

जळगांव
ता. १।२।३० } मि. का. भोरटके.

# नन्दिनी.

## ( कथानक )

भारतवर्षांतील राजस्थान ( राजपुताना ) देश ह्मणजे अनेकविध अशा उत्कृष्ट मानवीगुणांची केवळ खाणच होय. देशाभिमान व धर्माभिमान, शौर्य व धैर्य, साहस व शील यांच्या मूर्तिमंत उदाहरणांनीं राजस्थानच्या इतिहासाचा बाग फुलून गेला आहे. प्रस्तुत खंडकाव्याचें कथानक राजस्थानांतीलच आहे.

उदेपूरचा राणा जयसिंग हा १६८१ ते १७०० या काळांत राज्य करीत असतां दिल्लीचे मोंगल व रजपूत यांच्यामध्यें देसोरी येथें घनघोर युद्ध होऊन त्यांत रजपुतांचा पराभव झाला. या युद्धांत दिल्लीचा मोंगल बादशहा औरंगजेब याचा सेनापती दिलीरखान होता व रजपुतांकडे मंडनगडचे राजे सबलसिंह व रामपुरचे राजे अजितसिंह हे होते. हे दोघेही अनुक्रमें चोंडावत व सूक्तावत या ज्या रजपुतांच्या लढाऊ शाखा त्यांचे अग्रणी होते. रजपूत आपणास आटोपत नाहींत असें पाहून दिलीरखानानें एक विलक्षण कपट-नीति योजिली. त्यानें सबलसिंह व अजितसिंह या दोघांच्या नांवाचीं दोनपत्रें तयार केलीं. दोन्ही पत्रांत सारखाच मजकूर होता कीं, " तुह्मी कबूल केल्याप्रमाणें आतां आह्मास येऊन मिळावें, वेळ हीच आहे. " या दोन पत्रांपैकीं अजितसिंहाच्या नांवाचें पत्र सबलसिंहाच्या हातीं पडावें व सबलसिंहाच्या नांवाचें पत्र अजितसिंहाच्या हातीं पडावें अशी त्यानें योजना केली! त्याप्रमाणें सबलसिंहांच्या हातीं पत्र पडलें. परंतु अजितसिंहांच्या हातीं कांहीं पत्र पडूं शकलें नाहीं. कारण दिलीरखानानें ज्या दूतावरोबर तें पाठविलें होतें, तो अजिताकडे जातां जातां मध्येंच युद्धाच्या गर्दीत मारला गेला

इकडे सबलसिंहाच्या हातीं पत्र पडतांच त्यांस कळून आलें कीं, हें अजितसिंहांच्या नांवाचें पत्र दूताच्या चुकीनें आपल्या हातीं आलें आहे. अर्थात् त्याच पत्रानें त्यांस अजितसिंहांच्या फितुरीची जबर शंका येऊन आतां आपण मात्र दोघांच्या कचाट्यांत सांपडणार या भीतीनें त्यांनीं युद्धांतून अंग काढिलें. पुढें मोंगलांचा लोंढा एकट्या अजितावर पडून त्यांचा मोड झाला. सबलसिंहांनीं उदेपूरच्या राणाजींची गांठ घेऊन त्या पत्राच्या आधारें अजितसिंहाच्या फितुरी विषयीं त्यांची खात्री करून दिली. राणाजींनीं क्रोधावेशांत अजितांचें रामपूर संस्थान जप्त करून अजितसिंह व त्यांचा पुत्र विजयसिंह दोघांस कैद करण्याचा हुकूम दिला व तें काम सबलसिंहासच सांगितलें.

चोंडावत व सूक्तावत या रजपूत शाखांत शौर्याभिनिवेशानें कुलपरंपरागतच वैर चालत आलें आहे. त्यामुळें सबलसिंहाच्या मनांत अजिताविषयीं कुलद्वेष होताच. त्यांच्या तावडींत विजयसिंह सांपडला पण अजितसिंह हे सांपडले नाहींत. ते आपल्या मातृहीन कन्येसह–नंदिनीसह–अरवली पर्वतांत जाऊन राहिले.

अरवली पर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या राजसमुद्र सरोवरा-वर नंदिनी नौकाविहार करीत असतां एकाएकी अभ्रें येऊन वादळ उत्पन्न झालें व नंदिनी होडीसह त्या सरोवरांत बुडाली. तिच्या किंकाळीसरसी तीरावरून कोणी एका तरुणानें सरोवरांत उडी घातली व त्या सौंदर्यमोहिनीला मूर्छित स्थितींत वर काढिलें व सावध केलें. हा तरुण ह्मणजे मंडनगडचा युवराज अचलसिंह होता. त्याची उदेपुराच्या हद्दींतील राजद्रोही व बंडखोर लोकांच्या शोधावर नेम-णूक झाली होती. ते लोक अरवलींत दडलेले होते. व त्यांच्या राजसमुद्रावर कधीं कधीं गुप्त सभा होत असत. ह्मणून तो तेथें आला

होता. जवळच त्याची छावणी होती. नंदिनीस सावध करून त्यानें तिचें कुलवृत्त विचारिलें. ती अजितसिंहाची कन्या आहे हें ऐकून तो स्तंभितच झाला. अजितसिंह पूर्ण निर्दोषी आहेत ही त्याची खात्री झाली होती. ही खात्री होण्याचें कारण असें झालें कीं, अजिताकडे पत्र घेऊन येणारा दिलेरखानाचा जो दूत मध्येंच युद्धाच्या गर्दींत मारला गेला त्याच्या मुलाच्या हातीं तें पत्र आलें. पितृदु:खानें वेडा झालेला हा दूत-पुत्र पुढें फकीर झाला. व तें सबलसिंहाच्या नांवाचें पत्र त्यांचें त्यांस पोंचविण्याचें शेवटचें पितृकार्य करण्याचा त्याला व्यामोह उत्पन्न झाला व तो फिरत फिरत मंडनगडास आला! तेथें अचलसिंहाची व त्याची गांठ होऊन त्यानें तें पत्र ताब्यांत घेतलें आणि आपल्या वडिलांस (सबलसिंहास) दाखवून त्यांचा ग्रह नाहींसा करण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु सबलसिंहाचें मन सुक्तावत शाखेच्या कुलद्वेषानें इतकें किडून गेलें होतें कीं त्यांनीं त्या पत्राला कांहींच महत्व दिलें नाहीं.

नंदिनीसारख्या सौंदर्यशालिनीस या कुलवैरानें निष्कारण विजनवासिनी व्हावें लागलें व तिच्या निरापराधी बंधूस मंडनगडच्या तुरुगांत व्यर्थ खितपत पडावें लागलें आहे या गोष्टींचा त्या उदार राजपुत्राच्या मनावर परिणाम होऊन त्यानें आठ दिवसांत तुला तुझ्या बंधूची भेट घडवितों असें नंदिनीस सांगून तिचा निरोप घेतला व बापाला न कळत रात्रींच्या वेळीं मंडनगडच्या तुरुंगांत शिरून विजयसिंगाची सुटका केली. त्यानें विजयसिंहास बापाच्या आणि बहिणीच्या भेटीस पाठवून दिल्यावर तो उदेपुराकडील आपल्या छावणींत आला.

या वेळीं उदेपूरचे राणे जयसिंग यांनीं युवराज उमरावसिंग यास 'राजप्रतिनिधि' पद देऊन 'पंचोली' नामक आपल्या वृद्ध सचिवास त्याच्या मदतीस दिलें होतें व ते स्वत: जयसमुद्र तीरावरील

राजमहालांत विलासमग्न झाले होते ! मंडनगडच्या तुरुंगांतील उदेपु-राचा राजकैदी सोडविणारा हा आपला पुत्र असला तरी त्याला कैद करावें असें सबलसिंहांना उदेपुरास लिहून कळविलें. राजप्रतिनिधी उमराव हा तापटवृत्तीचा असल्यामुळें त्यानें अचलसिंहास कैद केलें इतकेंच नव्हें तर पंचोली दिवाणांची अनुमती नसतां त्याच्या शिर-च्छेदाचा त्यानें हुकूम दिला.

तेव्हां सबलसिंह हे पुत्ररक्षणार्थ मंडनगडाहून सेनेसह धावून आले. ज्या दिवशीं अचलसिंहाचा शिरच्छेद करण्याकरितां त्यास उदेपुराच्या राजपथावर आणिलें त्याच दिवशीं सबलसिंहांनीं उदेपु-राच्या वेशीवर हल्ला चढविला. इकडे अजितसिंह व विजयसिंह या पितापुत्रांनीं रामपूरच्या घोडदळाचा हल्ला चढवून ते शहरांत घुसले. विजयसिंहानें अचलापर्यंत घोडा भिडवून त्यास चपळाईनें आपल्या घोड्यावर घेतलें व मार्ग काढिला. पंचोली दिवाणांनीं हा अनर्थ पाहून आधींच एक घोडेस्वार राणाजींकडे पाठविला होता व युवराज उमरावसिंगाच्या तामसी वृत्तीनें घडलेला प्रकार कळविला होता. सबलसिंहांनीं उदेपुरी फौजेचा पराभव केला. इतक्यांत राणाजींकडे पाठविलेला स्वार राणाजींचें आज्ञापत्र घेऊन आला. त्यांत लिहिलें होतें कीं--" युवराज उमराव यास राजप्रतिनिधि पदावरून दूर करून तो अधिकार तूर्त पंचोली दिवाणास देण्यांत आला आहे. युद्ध थांबवा आणि अपराधी अचलसिंहास माझ्याकडे पाठवा. "

आधींच पराजयानें व अचलसिंहाच्या सुटकेनें राजपुत्र चिडून गेला होता. त्यांत वरील राजाज्ञेची भर पडल्यामुळें तो बापावर रागावून बुंदी नामक शहरीं आजोळास निघून गेला. तेथून आपणांस अनु-कूल असणारे कांहीं सरदार व बुंदीचें सैन्य घेऊन हा पितृद्रोही कुमार कुमळमेरचा उदेपुरी खजिना लुटण्यास धावला. या समयीं

अचल व विजय हे दोघेही आपल्या सैन्यनिशीं त्यास आडवे झाले उमरावाचा व या दोघा उदयोन्मुख योध्यांचा तुमुल संग्राम होत असतां तेथें सबलसिंह व इतर राजपक्षीय सरदार धावत आले व सर्वांनीं मिळून उमरावसिंगाचा पाडाव केला. पश्चात्ताप पावलेला राजपुत्र बापास शरण गेला. त्या पिता-पुत्रांच्या भेटी एकलिंग-जीच्या देवळांत झाल्या. तेथेंच अचलसिंहानें अजितसिंहावरील फितुरीचा कलंक नाहींसा केला. आणि अजितसिंहांनीं आपली कन्या नांदिनी हिचा हात अचलाच्या हातांत दिला. पुढें त्या दोघांचें उदेपुरांत राणाजी समक्ष थाटानें लग्न झालें.

कै. वा. का० धों० भोरटके.



# अर्पण पत्रिका.

कै. का. धों. भोरटके यांस
ही काव्य-कलिका त्यांचे स्मृत्यर्थ
अर्पण केली असे.

दु. आ. तिवारी.

# नन्दिनी

४२८९

## भाग १ ला.

राजपुतान्यांत उदेपुराजवळ अरवली पर्वताच्या पायथ्याशीं ' राजसमुद्र ' नांवाचें रमणीय सरोवर आहे. त्यांत एक तरुणी रात्रीच्यावेळीं नौका घेऊन विहार करीत होती. एकाएकी आकाशांत अभ्र आले, तुफान वृष्टि झाली आणि खवळलेल्या लाटांनीं ती होडी खडकावर आदळून जलमग्न झाली ! त्यावेळीं त्या रमणीनें जी निराशेची किंकाळीं फोडिली त्या किंकाळीनें कोणी एका तरुणानें तीरावरून उडी टाकून तिला मूर्च्छित स्थितींत वर काढिलें. हा मंडनगडचा युवराज ' अचलसिंह ' होता. त्यानें तिला सावध केलें व तिचें पूर्ववृत्त विचारिलें. तें ऐकून तो प्रणयी वीर अंतःकरणांत विरघळून गेला. या वनवासिनीचें नांव नन्दिनी असून ती अजितसिंहाची मुलगी होती आणि अजितसिंह हा तर मंडनगडच्या भूपालाचा वैरी होता ! नन्दिनीचा भाऊ ' विजयसिंह ' हाही मंडनगडच्या तुरुंगात होता. हें वैर व्यर्थ होतें. या वैराग्नींत दिव्य सौंदर्य जळत असलेलें त्यास पाहवलें नाहीं. " आजपासून आठ दिवसांच्या आंत तुझी व तुझ्या भावाची गांठ पडेल. " इतकेंच बोलून तो निघून गेला. याच वेळीं नन्दिनीचा पिता तिला शोधीत तेथें आला होता.

## साकी.

**राजसमुद्रः—**

राजस्थानीं उदेपुराच्या राजसिंह रायाचें—
[१] यश जणुं केवळ, नांव गाजतें ‘राजसमुद्र’ तयाचें
शैल अरवली तद्धृदयाच्या ओघ प्रेमरसाचा
प्रकट होउनी संचित झाला तडाग रूपें साचा !
प्रताप पृथ्वीराज नृपांच्या चरितांना गाऊन
राज-महीचे आनंदाश्रू गेले कीं सांचून
उदेपुराच्या भूपालांच्या विमल यशोदेवींचा-
आदर्शचि जणुं अभंग, भूतलिं मुख अवलोकायाचा
सिसोदियांचें चमकुन गेलें राजस्थानीं तेज
तत्तुलनेला एकच साधन तडागरूपें आज !
अगाध निर्मल सलिलें भरलें सरोवराचें तीर
विद्वानाच्या हृदयीं जैसें ज्ञान वसे गंभीर !
सभोंवताली हिरवी हिरवी लवली होती झाडी
शारद वायू हांसत खेळत कुसुमें सलिलीं पाडी

---

१ ‘राजसमुद्र’ हा भव्य तलाव उदेपूरचा राणा राजसिंह यानें बांधिला. त्याला ९६ लक्ष रु० खर्च आला असून त्याचें बांधकाम सात वर्षे चाललें होतें. हा तलाव उदेपुरापासून १२ कोसांवर अरवलीच्या पायथ्याशीं गोमती नदी अडवून तयार केला आहे.

धवल चंद्रमा धवल जळीं त्या विलसत होता तेजें
भावपूर्ण-हरिभक्त-हृदंतरिं जैशी मूर्ति विराजे !
अवनीं शांती, गगनीं शांती, अष्ट दिशींही शांती
वसुधा देवी सेवित होती निद्रेची विश्रांती
क्षितिजावरतीं तुरळक दिसती पयोधरांच्या राजी
तरुलतिकांची तैशी छाया सरस्तटाकामाजीं
शुभ्र कुमुदिनी खालीं, वरती शुभ्र तारका दोन्ही
हांसत होत्या ज्योत्स्नेचें पट मुखावरी घेवोनी

**नौकाविहारः-**

ऐशा समयीं कोणी तरुणी नौकेवर बैसोनी-
विहरे, जैशी कविता कविच्या चित्तीं प्रतिभा-यानीं
लज्जित झाल्या आकाशींच्या तारा तिजसि बघोनी
चंद्र-मुखावर विवर्णतेची छाया येइ दिसोनी !
बाप्पा राउळ, हमीर राणा दिगंत त्यांची कीर्ती
कीं धवलांगी-रूपें तेथें प्रकटित झाली होती !
जोहाराच्या कुंडामधली पवित्रता ती काय ?
उदेपुराच्या नृपवंशाची भाग्य-देवता काय ?
बलाढ्य राणा संग, तयाच्या ती धारा खड्गाची
विपत्कालची ढालच कीं ती प्रताप भूपालाची ?
काय पद्मिनी नव-रूपानें आज उतरली खालीं

चितोडची कीं राजसमुद्रीं राजलक्ष्मि ही आली ?
कोमल कोमल दो-हातांनीं कमला वल्हवि होडी
धन्यचि तो यत्संसाराची वल्हवील ती होडी !
चंचल लहरीसम तत्कुंतल नाचत होते भालीं
स्वच्छंदाचा क्रीडानंदहि विलसत होता गालीं
पाहुन तिजला कोणाचेंही मन आनंदित व्हावें
नाम 'नन्दिनी' कां न तिचें तें अन्वर्थक वाटावें ?
मोहकतेच्या परमावधिचें दृश्यचि मंगल हो ! तें
विरक्त असतां कुणि जरि तेथें तन्मन मोहित होतें
तीरावरचा गंधानिलही मोहित होउन तीतें
धांवत गेला सांगायाला क्षितिजीं घनमालेतें !

जलवृष्टिः—

बघतां बघतां-कृष्ण घनांनीं अंबर जाय भरून
सौंदर्याच्या स्थानीं गेली भीषणता पसरून
वायूसंगें अंभोदांचे समूह धांवत होते
रूप-गतीनें मत्त गजांच्या पावति ते उपमेतें
चंद्र लोपला, पृथ्वि बुडाली अंधाराच्या पूरीं
स्तनितामागुन चंचल चपला नाचे गगनद्वारीं
मनोज्ञ ज्योत्स्ना-समय कुठें तो, उग्र काल हा कोठें !
आकस्मिक जी घटना, तदुदरिं भविष्य वसतें मोठें

नंदिनी.



|| कोमल कोमल दोहातांनीं कमला वल्हवि होडी | धन्याचि तो यत्संसाराची वल्हवील ती होडी || (पा. ४)

नव्हति कल्पना क्षणांत सृष्टी फिरविल अपुलें रूप
वळवाचे घन जमतिल करितिल जल-वर्षाव अमूप
क्षणांत होइल काय ? कुणाला हें कथितां येई न
क्षणांत तारा आकाशींची गळते सदनांतून
क्षणांत विझतो दिवा समीरें, क्षणांत बुडते होडी
क्षणांत उठती बुद्बुद विरती, क्षणांतलीं हीं कोडीं
क्षणांत हंसतें, क्षणांत रडतें बालक छकुलें सान
क्षणांत जातो प्राण निघोनी, क्षणांत गळतें पान

**जलमग्नता:—**

लहरीवरती लहरी उठल्या सागर-हृदयीं जैशा
सकंप बाला-हृदयिं विहरल्या भयलहरीही तैशा
सरस्तटाकाजवळीं जों जों कुमुद्वती ती जाई
तों लहरींच्या आवर्तासह पूर्वस्थानीं येई.
अंभोदांनीं जलधारांनीं केलें आर्द्र तियेला
असह्य झाली परम शीतता त्या सुंदर नलिनीला
विहारार्थ ती मनोहारिणी आली होती जेथें
दैवानें कां जीवन-संकटिं ओढावें तिज तेथें !
जेथें आले अभिषेकाला राम अयोध्या-स्थानीं
काय विधीनें तेथुनि त्यांना लावावें हो ! रानीं !
क्लांत करांतिल वल्हें सुटलें, सुटला त्यासह धीर

मुक्त हस्त तो भाळीं गेला, नेत्रीं भरलें नीर
जलदेवींनों, या या वरतीं, रक्षा भू–देवीला
वनदेवींनों धांवा धांवा सखीस या सांभाळा !
पयोदपटलामधुन विधो ! ये झणिं उतरोनी खालीं
तव उपमेची साधन-मूर्ती संरक्षी या कालीं
लावण्याची ज्योत विझोनी जाइल सलिलीं हाय
विधे ! तुझ्या सुकृतीची चिंता तुलाच नाहीं काय ?
झंझावातें जर्जर जैसें पुष्प नभांत फिरावें
दो कोसांच्या परिघीं तैशी नांव तिची हेलावे !
खालीं पाणी, वरती पाणी दिशेदिशेला पाणी
संकटकालीं तद्धृदयाचें झालें पाणी पाणी
वीज चमकली, तीरही दिसलें, परी जहाला घात
सलिलाच्छादित भव्य शिलेवर होय अहा! आघात
लाटेमागुन लाट येउनी होडी उपडी झाली
अंतीं एकच कारुण्याची किंकाळी तैं आली
तीरावरुनी किंकाळीसह उडी घातली कोणीं
क्षणभर दिसला जलमग्नचि तो, मग येई उसळोनी

**मूर्छित रमणीः–**

दग ओसरुनीं पुन्हां चंद्रमा कांति प्रगटित होता
शीतशीततर तडाग--वायू कांपवीत तनु होता

वाहत होते वृष्टिजलानें भरलेले ओहोळ
मधुनच उमटे कुंजामधुनी वन--विहगाचा बोल
प्रवात--चंचल पादपांतुनी टपटप गळतें नीर
अवला-रक्षक घेउन आला तिथें तिला बलधीर
त्याच्या हातीं तन्वी गमली कलिका निशिगंधाची
भार तियेचा त्यास गमे जणुं माळ करीं कुंदाची
कालमुखांतुनि ज्या हरिणीला काढियलें बाहेर
मूर्च्छित तिजला पाहुन होई भ्रांत अंतरीं वीर
उपाय केले सावध व्हाया यश ये यशवंताला;
चैतन्याचा भास जन्म दे महदाशानंदाला
चंद्रकलेची रूपसंपदा आकर्षी नेत्राला
देव सुंदरी चुकून आली ही का भूमितळाला ?
ओलीं वस्त्रें त्यांतुनि दिसती मृदूंगीचीं गात्रें
लावण्याची सुधा प्राशि तो केवळ दर्शनमात्रें
स्वांकावरतीं तच्छिर घेई, ओले कुंतल सारी
म्हणे– "कुणाची भाग्य-देवता होइल ही संसारीं ?"
स्त्रीरत्नांतिल अमोल हिरकणि नृपसदनीं शोभावी
काय विधीची विचित्र लीला ती वनवासिनि व्हावी !
निज-जन्मानें कोणाचें कुल शोभविलें बालेनें ?
निर्जन कानन निजवासानें केलें धन्य इयेनें

सुकृत-संचयें असेल नटलें कोणाचें तें भाल ?
सरोजिनी ही घालिल ज्याच्या कंठीं प्रेमें माळ
कोणाचें गृह निजवासानें इंद्र-भवन ह्मणवील ?
निजस्मितानें नंदनवनिंची शोभा संवर्धील
अशा विचारीं तन्मन असतां तिचा निघे उच्छ्वास
उत्सुकतेची दृष्टि तयाची खिळली तद्वदनास
क्षीण तिच्या त्या कंठामधुनी शब्द उमटला 'आई'
हळूच विकला नेत्र उघडुनी सभोंवतालीं पाही
आर्द्र वसन करिं सांवरुनी ती उठली विनया बाला
पाहुनि वरतीं लज्जावति ती लववी निजवदनाला

**प्रथम परिचयः—**

शीळ घातली तरुणानें तों अनुचर आला वेगें
अस्फुट आज्ञा ऐकुनि कानीं, धांवत गेला मागें
क्षणिं येवोनी सेवक, वसनें ठेवुन गेला तेथें
शुभ्र चंद्रिकेमधें तयांचे कांठच चमकत होते !
मुक्त केश पाठीवर रुळती दृष्टी निज चरणाशीं
रसवंतीचे शब्द घोळती मधुर मधुर कंठाशीं
" उदार चरिता ! कोण तुह्मी या वांचविलें अबलेला
निज जन्मानें वंश कोणता धन्य पदाला नेला ?"
तद्वाणी ती-छे ! अमृताची धारा तो प्राशोनी

उचित पदावलि परिमित वाक्यें योजुन वदला वाणी
" ओल्या वस्त्रें कांपत आहे देवि! देह तव पाही
स्वीकृत करि हीं वस्त्रें आधीं तुज शंका न असावी
वृक्षलतांच्या मागें जाउन दोघे वसनें ल्याली
परिसुं लागली मद्चरित ती अंगुलि ठेवुनि गालीं

**तरुणाचें आत्मकथनः--**

चोंडावत जी रजपूतांच्या बीनीवरची शाखा
जन्म घेतला त्या वंशीं मी पुत्र सबलसिंहाचा
मंडनगडची राजनिष्ठ जी प्रजा असे विख्यात
'भावी राजा अचलसिंह हा' वदते मज पाहात
उदेपुराची गादी तीचे आह्मी बहु अभिमानी
अर्पियल्या तिजसाठीं माना अमुच्या कुलपुरुषांनीं
आजहि आलों उदेपुराची कानीं पडतां हाक
अरवलींत या राजद्रोही दडले भरुनी धाक
राजाज्ञेनें प्रेषियलें मज शासन त्यांना द्याया
सुभगे! झालें कारण हेंची शैलवनीं मज याया
राजसमुद्रीं खल दुर्जन ते जमताती ऐकून
एकाकी मी आलों, तों तव घडलें दर्शन--पुण्य
निरीक्षणाची दृष्टि विहरली तुझ्या जलक्रीडेंत
केला जवळी प्रांत तटाचा भ्रांत जलद-पीडेंत

नाव बुडाली कानीं आली भेदक तव किंकाळी
त्या सरसी मी उडी घातली श्रमसार्थकता झाली
वनस्थलींची शोभा वर्धित करिशी तूं कां रानीं ?
अश्रुतपूर्वा त्वद्वृत्ताची ऐकवि मजला वाणी"

**नन्दिनीः–**

बोलुन ऐसें अचलसिंह तो अचल तिजकडे पाही
कृतज्ञतेची दृष्टि--शलाका त्याजकडे ती वाही
तिच्या मुखीं जी लवली होती आर्द्र कचांची माला
तिच्यांतुनी जल-मौक्तिक-माला ठिपके भूमि-तळाला
ती कच--माला सारित सारित गोरी वरती पाहे
दृश्य गमे तें कृष्ण ढगांतुनि शशांक उगवत आहे
मंजूषेंतिल गुप्त दिव्यतर रत्नदर्शना–पूर्वी
जी उत्कंठा ओढ लाविते ती तद्वचनीं लावी
वदे:– "जनक मम अजितसिंहजी सूक्तावत शाखेचे
बाल्यचि माझें येथें गेलें त्यासह वनवासाचें
विटप, वल्लिका, कानन हरिणी हे माझे सांगाती
वनविहगांच्या सवें गाइलीं गाणीं किति एकांतीं
अभागिनी मी उदरीं आल्यें, दुर्दैवहि तें आलें
नेलें तेणें निजमातेला, मातृहीन मज केलें
आठवतो मज बंधु 'विजय' परि वार्ता कळली नाहीं

तत्स्मृति-दुःखें जनकाश्रूची धारा खळ खळ वाही
दुःखाची झळ, मातें न लगो ह्मणुनी गत गोष्टींचा
इतिहासचि तो हृदयिं झांकला मज्जनकानें साचा
तत्प्राणांची हृदयज्योती कीं तारा नयनाची
आज उदारा ! रक्षुन केली उपकृति चिरकालाची
पीयूषाची निर्मल धारा, कीं स्वातीचें पाणी
कर्णसंपुटीं 'नन्दिनि ! नन्दिनि !' वागविते तद्वाणी
वात्सल्याची मूर्ती उटजीं दुःखी झालि असेल
ढाळित अश्रू कंपित तनु ती तीरीं फिरत असेल
मजसंगें या वीर-कुमारा ! पित्यासही सुखवावें
वनवासिनिच्या आतिथ्यांतिल पूजेला सेवावें"

**ही तर अजितसिंहाची कन्याः—**

तज्जनकाचें तद्वंधूचें नांव ऐकिलें जेव्हां
कोमेजोनी एकाकी मुख गेलें त्याचें तेव्हां
हातामधलें पुष्प गळावें उडून जावें वातें
कीं अमृताचा कुंभ गळोनी सांडावा भूमीतें
पिकलेलें फळ गळुन पडावें, ग्रासावें मातीनें
किंवा व्हावी भरल्या शेतीं नासाडी वृष्टीनें
झोके घेतां दोर तुटावा, नाव मधेंच बुडावी
कैशी झाली मनःस्थिति ती त्याची त्यासचि ठावी

मोहरलेल्या आम्रावरतीं वळली अभ्रच्छाया
देंठीं देंठीं जळुनि मंजिऱ्या शोभा गेली वाया
आकाशांतिल ढग ओसरले, त्याच्या चित्तीं आले
विचार-वारे अनंत शिरले, उदास मानस झालें
अजितसिंह तो मंडनगडच्या भूपालाचा वैरी
विजयसिंहही मंडनगडच्या होता कारागारीं
तो अनुरागी प्रणयी त्याला कठोरता सहंवेना
द्वेषज्वालीं हर! हर! जळते कोमलता बघवेना
मळे सुभगता निजदेशाची अमुच्या या कलहानें
जागृति त्याला हितवचनांची दिधली या समयानें
रक्षियली जी आपण अबला तिजलागीं सुखवावें
शूर पुरुष जो त्याला हें हो! लागे कां शिकवावें !
तोच ह्मणावा क्षत्रिय कीं जो संरक्षक दीनांचा
मोहांतूनी मार्ग काढितो पवित्र कर्तव्याचा
परि अजिताच्या भेटीला त्या उचित न गमली वेळ
पुत्र स्मृतिनें दुःख निर्झरी वाहाया लागेल.
लागे त्याचे विचार येथे लिहावयाला वेळ
ते तच्चित्तीं आले गेले, क्षण भरलाहि नसेल
वदे-"प्रबोधिनि ! कंपित झालों परिसुनि तव वृत्ताला
मद्धृदयाच्या फलकीं कांहीं ओळी लिहिल्या गेल्या

संजिवनि गे ! येथुन आहे निकट चमूचा गोट
अनुचर माझे पाहत असतिल उत्कंठेनें वाट
येइन पुनरपि शीलवती गे ! दर्शनास या स्थानीं
विसर न मातें घडेल केव्हां? वचन सत्य हें मानीं
सर्वेच कथितो ऐक भाग्यवति ! तव ज्येष्ठ भ्रात्याची
अल्प दिनांतचि भेट मंगले ! घडेल चिर विरहाची
या शुभ वाणी सर्वेच 'बाले ! नन्दिनी !' वाणी ऐके
" बाबा " ह्मणुनी दृष्टी वळतां, यास न तेथें देखे

---

## भाग २ रा.

कृष्णपक्षाची अष्टमी तिथी होती. पूर्वेस चंद्र उगवत होता. अशा वेळीं मंडनगडाचा युवराज अचलसिंह हा मंडनगडास येऊन बापाला न कळत तुरुंगांत शिरला. व त्यानें नन्दिनीचा भाऊ विजयसिंह ह्याची सुटका केली. नंतर ते दोघे एका कड्यावरून दोराच्या साह्यानें खालीं उतरले आणि संकेतस्थळीं बांधिलेल्या घोड्यांवर बसून उदेपुराकडे निघून गेले. उदेपुराच्या अलीकडे एका निर्झरणीच्या तीरावरून राजसमुद्राकडे जाणारी वाट फुटत होती. तेथून अचलसिंहानें विजयसिंहास नन्दिनीच्या व त्याच्या बापाच्या भेटीस पाठविलें आणि तो स्वतः उदेपुराकडील आपल्या गोटाकडे परत आला.

**मंडनगडः—**

तिथी अष्टमी, पूर्वदिशेचें मुख शशि चुंबित होता
मंडनगडच्या शिखरिं धवलिमा हळु हळु विलसत होता
मधुनिच कोठें दीपक चमके, शेकटि दावी जाळ
प्रहरांचे ध्वनि सुचवित होते मध्य निशेचा काळ
हळु हळु चढला शैलशिरावरि शुभ्र रुपेरी साज
भोंवतालच्या वसुंधरेचा तो शोभे अधिराज
तो गढ किंवा विश्वनाथ जो पिंड तयाची एक
चंद्र जिच्यावर करीत होता दुग्धाचा अभिषेक
वसुधा देवी निद्रित माता, पदर सरकला तीचा

गौर गौर हा कुच उघडा कीं पडला त्याच-सतीचा
स्वर्लक्ष्मी कीं रौप्य-करंडक हातीं घेउनि आली
तो हा येथें राज्यश्रीचें स्वतां रूप ती ल्याली
अभेद्यतेची निसर्ग-रचना थक्क करी बुद्धीला
सभोंवताली दीर्घ पसरल्या भव्य तटाच्या माला
तोड्याच्या बंदुका करीती बुरुजावर पाहारा
गस्तकऱ्याच्या करीं झळाळे तरवारींची धारा
ऐशावेळीं कारागेहीं प्रवेश कैसा व्हावा ?
प्रवेशला परि एक धाडसी, जो सिंहाचा छावा!

## तुरुंगांतील कैदीः–

कृष्ण शिलांच्या भिंतीमाजी खोल्या खोल्यांतून
दैवाच्या जणुं अंकावरतीं निजले बंदीवान
लोहकड्यांचा खळ खळ कोठें ऐकूं येई नाद
प्रहराशीं करितसे पहारा मैत्रीचा संवाद
एकच जागृत कैदी अपुल्या अंधाऱ्या खोलींत
निजभाळावर हात ठेवुनी अश्रु बसे ढाळीत
पूज्य पित्याच्या, प्रिय भगिनीच्या बहु आठवणी आल्या
निराश तैसें उदास त्याचें अंतर जाळित गेल्या
"निजजनकाची निजदेशाची सेवा घडली नाहीं
फुलें फळें नच तीरीं ऐशी जीवन-सरिता वाही

पाणी सुकलें, कमलें सुकलीं, चिंता-दर्दुर मात्र
शुष्क तडागापरीस झालें आयुष्याचें चित्र
ध्येयावांचुन भकास मंदिर आयुष्याचें झालें
पर्णहीन जणु शिशिर-ऋतूंतिल देह-वृक्ष हा हाले
[1] सबलसिंहजी ! कुलास तुमच्या जगीं असो धिःकार
साधियलें कुलवैर लावुनी फितुरीची अंगार
जो सूक्तावत-वंशीं अजवरि डाग लागला नाहीं
द्वेषानें तो तुह्मी लाविला, होय तनूची लाही
यवनांसंगें युद्ध जाहलें अमुचें देसोरीचें
कितीक गेले वंश बुडोनी सुक्तावत शाखेचे
उदेपुराच्या गादीसाठीं रक्त सांडिलें ज्यांनीं
त्यांत असावें नांव सर्वथा अमुचें अग्रस्थानीं
देहावरचे शस्त्र-व्रण हे देती साक्ष तयाची
नृप-कर्णीं परि तुह्मी ओतिली विष-धारा फितुरीची

---

१ मंडनगडचा राजा सबलसिंह हा चोंडावत शाखेचा सेनाग्रणी होता. रजपुतांची मोगलाबरोबर जी देसोरीची लढाई झाली तींत सूक्तावत शाखेचा सेनानायक– रामपूरचा राजा, नंदिनीचा पिता– अजितसिंह हा मोंगलास फितुर झाला ह्मणून लढाई हरली गेली असें सबलसिंहानें उदेपूरच्या राण्यास सांगून त्याच्याच हुकुमानें अजिताचा पुत्र विजय यास कैद केलें. बिचारा अजितसिंह नन्दिनीसह अरवलींत जाऊन राहिला.

कुटिलपणानें राजाज्ञेनें मजसी बद्ध करोनी
दुर्दैवाचा अतिथी केला जनक सुतेसह रानीं
'रामपूरचे राव' ह्मणोनी गाजविली तलवार
ती हाताची सुटून चढला लोहाचा शृंगार

**स्वजन स्मृतिः-**

बाले! नन्दिनि सुजाण झाली असशिल वेल्हाळे तूं
नाममात्र मी परिचित, कुठला भेटीचा गे हेतू ?
वृक्ष मोडला, एक डहाळी त्यावरची तूं मैना
असेल किंवा नसेल छांया कांहींही समजेना
प्रळय जहाला, वंश बुडाला, तूं चिमणी खोप्याची
छकुले! उघडी पडली असशिल, हळहळ ही हृदयाची
हाय! पिताजी आयुष्याच्या शेवटच्या प्रहरांत
सुतविरहाचें दुःख सहावें लागे विजनवनांत
सुटेन कसचा ? सुटलों जरि तरि कुलकीर्तीची नाव
वल्हवीन अरि-रक्त-सागरीं 'विजय' तरी मम नांव
मनःसिंधुवरि विचार-लहरी नाचत असतां ऐशा
श्रवणीं आला लोहद्वारीं ध्वनि 'खड खड' तैं ऐसा

**अचलसिंहाचा तुरुंगांत प्रवेशः-**

आंत शिरे कुणि विशालबाहू राजपुतानी वीर
करीत असतिल मुजरे ज्याला समरचतुर रणधीर

'ऊठ?' ह्मणे बलशाली वीरा ! चंद्र तुझ्या भाग्याचा
अंधारांतुन वरती आला भोग सरे दैवाचा
द्वेषानल मज आज विझवुं दे, कीर्ति-कलंक धुवूं दे
बंधु-वियोगिनि भुवनसुंदरी हृदय तिचें शमवूं दे
परवशतेच्या फेक शृंखला, चल माझ्यामागून
'अचलसिंह' हा विचल न होइल निजवाणीपासून
'अचलसिंह' हें नांव ऐकतां उठला तो बेभान
वदे—" शत्रुकृत दया असे हा शूराचा अपमान !
मंडनगडचा राजपुत्र तूं, कुलवैरी सूक्तांचा
मुखि पय दिसलें तरी भरवंसा ये का सर्पसुताचा ?
दे आणोनी खड्ग करीं मम, उभा रहा युद्धाला
दयेंतील बहु लाजविते ही स्वतंत्रता मरणाला
बंधुवियोगिनि भुवनसुंदरी नांव तिचें ऐकीव
मायेच्या गळिं मासा अडके तळमळतो हा जीव
तद्वक्रोक्ती विचलित न करी अचलाच्या शांतीला
सत्यहितैषी प्रलाप नेणति, साधिति सत्कार्याला
विश्वासानें अचल बोलला त्याचा धरुनी हात
" जरि असता तरि उचलुनि देतों भंडारचि हातांत
नन्दिनि साठीं तरि माझ्यावरि ठेवावा विश्वास
मजला कळला, व्यर्थ वाटला फितुरीचा इतिहास

जो पळ जातो तो मोलाचा यासमयीं मज वाटे
कर्तव्याच्या मार्गावरतीं शंका पसरे काटे"
रजपूताच्या भंडाराच्या शपथेला परिसोनी
विजय–मनाचा संशय गेला विश्वासांत बुडोनी
उचलित नाहीं–रजपूतानें उचलियला भंडार
स्वीकृत कार्यीं चळावयाचा नाहीं तो झुंजार
उदित जहाला स्नेह–भाव तो आर्द्र करी नयनांना
कांचनतुल्यचि शूरांचें मन तेजस्वी मृदु जाणा
'शिवशंकर' जो मंडनमडचा कडा भयानक खोल
सर्पच जणुं कीं लोंबत होता तेथें बळकट सोल
तेथुन दोघे सर सर गेले, गेले गड सोडून
स्वतंत्रतेचे पुत्र हांसती निर्झर संतोषून
संकेतस्थलिं भव्य तुरंगम कर्ण उभारित होते
समीरणाला सारित गेले दोघांसह दोघे ते!

**प्रभातकाल:--**

पूर्वदिशेची सोनेरी कड तळपूं लागे छान
नवोपमेनें नव कविता कीं सुखवी जैसे कान
सुवर्ण-भूषण सृष्टिसतीनें काय घातलें कंठीं
किंवा उठुनि पदर सांवरी देवी हा जरिकाठी

कृष्ण-कन्हय्या खेळत आहे गोपींसह कीं होरी
क्रीडानंदें भरुन मारितो रंगाची पिचकारी
शुभ्र घनांचे समूह गमलीं कटिवस्त्रें गोपींचीं
प्रभा फाकली कीं देवांच्या ही यज्ञ--ज्वालेची
किरणस्वामी यज्ञांतुनि रवि--नारायण वर येई
ब्रह्मांडाचा पालनकर्ता प्रसन्न गगनीं होई
वृक्षीं वृक्षीं पक्षी गाती कंठमधुर नव--गाणीं
श्रवण मनोहर पावा वाजे लकेर घुमते रानीं
हंबरताती वत्स मागुनी, पुढें चालती गाई
चाटित कोणा उभी धेनुका, वळून कोणी पाही
गिरि-निर्झरिणी तरुलतिकांचा नेसुन हिरवा शालू
मुरडत चाले क्षेत्रीं क्षेत्रीं पिकला होता शालू
माळामाळावरून चाले गोफणचा फटकारा
शेता शेता मधून उसळे विहग--वृंद नभिं सारा
स्वच्छंदानें तीरीं क्रीडती हरिणांचीं नव बाळें
चाहूलानें कर्ण उभविती विलोल दिसती डोळे
या गिरि-नन्दिनिजवळुनि जाई राजसमुद्रीं वाट
येथें भिजले त्या दोघांच्या विलोचनांचे काठ

अचलसिंहः--

" विजयसिंहजी ! जा, आनंदें भगिनीला सुखवा जा
पावित्र्यें जो शद्ब निघाला, पूर्ण जहाला माझा

८२८१ क्र.

मीच मन्मुखें अल्प कृतीचा कसा करूं विस्तार ?
कळेल तुह्मा अल्प घटींतच घटित-कथेचा सार
'जनकद्रोही' 'राजद्रोही' ह्मणोत ह्मणतिल लोक
असेल माझ्या निटिलीं लिहिलें भोगिन तें निःशंक
पावित्र्याच्या सौंदर्याच्या बागेमधली आग
प्रशांत केली, शांतवील हा मज सुकृतीचा भाग
विशुद्धतेचें मानवतेचें निःस्वार्थी जें कर्म-
तें आचरिलें, तोषवील हा माझा मजला धर्म
आलों असतों तुमच्या संगें आग्रहास मानून
राजकारणीं दक्ष असावें तुम्हि आहां जाणून

**विजयसिंहः–**

आधिंच ज्याचें लवलें होतें अंतर उपकारानें
त्या विजयातें अचल- वैखरी सजल करी बाष्पानें
गद्गद कंठीं सहज निघाला कृतज्ञतेचा ओघ
तप्त घटांतुनि जैसा येई वर दुग्धाचा वेग
"अचलसिंहजी ! तुह्मी सारिला प्रारब्धाचा भोग
कुल-वैराची कीड जाळिली, नष्टचि केला रोग
पुन्हां निश्चयें तुह्मास कथितों व्यर्थ दोष फितुरीचा
हा तर केवळ सूड उगविला होता कुल-वैराचा

उदेपुराच्या गादीची हो ! शपथ न आम्ही दोषी
जाळित सुटली आग अह्माला व्यर्थ व्यक्तिद्वेषी
जातींचे या कलह माजले भारतदेशीं हाय
द्वेष-मत्सरावीण न जागा ठेवायाला पाय
ज्या मेवाडासाठीं अमुचे मृत्यूच्या दारांत
निर्वाणीच्या समयिं न फिरले तरवारींचे हात
ज्या मेवाडासाठीं करुनी ललनांचे जोहार
अंतीं शरिरावरी चढविला केसरिया शृंगार
ज्या मेवाडासाठीं तोफा धडकत असतां छाती
मिरवित गेलों, उन्मत्तांना रणीं चारिली माती
तोच देश हा, तीच जन्मभू, पुत्र अह्मी रणशूर
काय तिच्याशीं द्रोही होऊं ? भरून येतें ऊर
जिच्या रक्षणीं अह्मी कटीला वागवितों तरवार
काय तुह्माला सत्य वाटतें करूं तियेवर वार ?
पूर्वज--चरितें जिवंत असतां मळविल तत्कीर्तीस
क्षत्रिय कोणी जननीच्या का लाविल दोष कुशीस
कशास आतां स्मृती तयाची कुभांड कळलें सारें
पापाचे जे रचिले गेले, तुह्मी उतरिले भारे
कुळांत कोणी धन्य निपजतो, स्मृति या कवि-वचनाची
कुलपुरुषेंद्रा ! मला दिली, तीं रिझविल संतत साची

शीलश्रेष्ठा ! संकट येतां धैर्यास न सोडावें
करीन संकटिं साह्य तुह्मांला काय मुखें बोलावें ?
दोघे गेले दोन दिशांनीं प्रवाह कीं शौर्याचे
सरिता अजुनी गीत गातसे तत्संगम--कालाचें .

---

## भाग ३ रा.

गोमती नदी जेथें जयसमुद्रांत शिरते तेथें एका शिलातलावर नंदिनी बसली होती. आंब्याला नुकताच मोहोर फुटला होता. कोकिला गात होती व मोर नाचत होता. अशा वेळीं तेथें अचलसिंह आला. सौंदर्यमोहित झालेल्या त्या युवकानें आपला दिव्य प्रणय व्यक्त केला. तिनें आपल्या अनुरागाची खूण ह्मणून हातांतलि एक फूल त्याच्या पायाजवळ वाहिलें. इतक्यांत नंदिनीचा भाऊ विजयसिंह तेथें आला. तो आदरानें अचलसिंहास आपल्या पर्णकुटींत घेऊन गेला तेथें नंदिनीच्या पित्याची व त्याची भेट झाली. या पर्णकुटींत दोन दिवस राहून अचलसिंह निघून गेला.

यानंतर लौकच एके दिवशीं विजयसिंहानें बातमी आणिली कीं, उदेपूरचे युवराज उमरावसिंग यांनीं अचलसिंहानें आपणास सोडविलें ह्मणून त्यास राजद्रोही ठरवून देहांताची शिक्षा देण्याचें ठरविलें आहे. हें ऐकतांच नंदिनीचा पिता अजितसिंह चवताळून उठला. त्या पितापुत्रांनीं अचलसिंहास सोडविण्याचा निश्चय केला. विजयसिंहानें रामपुरास जाऊन आपले राजनिष्ठ लोक तयार केले.

**सरःसरिता:--**

पिता अरवली, तद्देहांतुन नदी गोमती येई
राजसमुद्र प्रियकर वल्लभ आलिंगन त्या देई
प्रिय-प्रियांच्या मनोज्ञ मंगल त्या संगम-भागांत
द्रुमाद्रुमाला वेष्टुन वल्लरि डोलति आनंदांत

समीर त्यांच्या सुम--हारांतिल पुष्पें उडवी ताजीं
स्वर्गंगेंतील तारकाच जणु विलसति सलिलामाजी
कथानकाची रम्य नदी ती, तो काव्याचा साठा
उपमेच्या बहु ज्यावरि नाचति चेतःकर्षी लाटा
जल-लहरी रवि-किरणें राजति, राजति नलिनी त्यांत
तत्पुष्पांच्या माला शोभति, त्या सागर-कंठांत
तीरावरची झाडी हाले, तच्छाया जालिं डोले
कलध्वनीनें कुंज लतांचे गजबजुनीया गेले
नुकता कोठें चढला होता आम्रतरूवर साज
ऐकूं येई ‘ कुहू कुहू ’ तेथोनी आवाज

**तीरविहारिणीः--**

शिलातलावर तेथें बसली होती नंदिनि बाला
शैलसुता कीं सागर-तनया भासे कवि-उपमेला
तीर्थनिवासी सिद्ध तापसी त्यांची ती चिच्छांती ?
ब्रह्मविदांची अनुभूती कीं जी कथिती वेदांती ?
कण्वाच्या कीं तपोवनांतिल शकुंतला ती होती ?
किंवा भीमक भूपालाची दमयंती ती होती ?
स्फटिकोज्वल जलबिंदु पदानें उडवित नंदिनि खेळे
कृष्णकलापीं जललवमुक्ताहार विराजुनि गेले

चंचल वायू मोहित होउनि तेथें घिरट्या घाली
स्पर्शुन जाई स्कंधावरचा पदर पाडुनी खालीं
समोर हिरवी एक टेकडी तिजवर नाचे मोर
हिच्या दर्शनें त्याच्या नेत्रीं प्रसन्नतेचें नीर

अनुरागीः—

प्राशी कोणी भाग्यवान तें लावण्याचें सार
ज्यास पाहतां विहारिणी ती लाजलाजती फार
दर्शनमात्रें खळी कपोलीं पडली मधु हास्याची
उठतां उठतां लगबग झाली ओसरल्या पदराची
"केव्हां आलां वीर--वरा! हें कानन भूषित केलें"?
कलहंसीच्या मंजु निनादें तन्मन मोहुन गेलें
"सौंदर्याची नेत्र--पिपासा शमवित असतां देवी!
कालाची तरि गगना कैशी विमोहिताला व्हावी?
सुंदरतेला ह्मणती अनुपम प्रेमाचें उद्यान
तप्त मनाला रिझवायाचें सुंदरता हें स्थान
विश्वंभर या जगतीं भरला लावण्याच्या तेजें
भजती प्रेमें लावण्याला कवि विज्ञानी जे जे
सौंदर्याच्या सुखीं जन्म घे ह्या मानव-संसार
तदर्थ सारे शिरीं वाहती परिश्रमांचे भार



दर्शनमात्रें खळी कपोलीं पडली मधु हास्याची (पा. २६)

स्रग्विणि नटली सौंदर्यानें पादप सेविति तीतें
आतप सहती, छाया धरिती, साधिति सुम-पूजेतें
स्वर्ग-देवते ! राजसुखाचा हेतुच नुरला माझा
करित रहावें तुझ्या सुखाची मंगल मंगल पूजा
तव सुखसाधन तव हितरक्षण यांत असावें श्रेय
तूं आनंदी सदा असावें हा आनंद मदीय
जनक--कोप तो राज--कोप तो यांनाही विगणोनी
विद्वेषाचें पाप--क्षालन केलें तुज सुखवोनी
ज्या वंशानें ललिते ! दिधला वनवासाचा ताप
हीच मनीषा, पुण्यवती गे ! होउं नये तव कोप

अनुरागिणीः--

निकटवर्तिनी मधु--वल्लीचीं कुसुमें घेउन हातीं
त्यांशीं खेळत परिसत होती प्रेमाची रसवंती
हृद्य वचन तें मंडनगडच्या सुविद्य युवराजाचें
तेणें केलें दोघांच्याही ऐक्य स्मित दृष्टींचें
तच्चरणाशीं नकळत सुम ती वाही वळवी मान
'भेटविला प्रिय बंधु गडे ! तुम्हिं वांचविला हा प्राण !'
दृष्टि वळविली, बंधु दिसे तिज, हसली प्रेमज्योती
टाकुनि दिधलीं शेष फुलेंही तिनें मागच्या हातीं

पहिलें होतें पुष्प तत्करीं, हींहि घेइ वेंचून
धन्य करी ती त्याला पहिल्या अनुरागाची खूण
'अचलसिंहजी ! केंव्हां आला ? चला चला उटजाला '
स्वसेस वदला बंधु ' नंदिनी ! कळीव जा बाबाला '
प्रणयसमर्पित धवल फुलें जीं होतीं अचल–करांत
तद्बंधाला सेवित वदला ' हा आलों इतुक्यांत '
परस्परांचे हात धरोनी जाती ते त्या वाटे
सूक्तावत--कुल चोंडावत--कुल तद्ग्रंथी ती वाटे

**मनोज्ञकुटिका:-**

उदग्र जेथें पर्वत–शिखरें चुंबिति आकाशाला
दऱ्या पसरल्या शैलवितानीं उदन्वतीहि विशाला
पाषाणांच्या तटामधोनी सरिता खळ खळ वाहे
जिथें वनश्री विस्मयकारी शोभा प्रगटित राहे
लहान मोठीं झाडें झुडुपें निबिड दिसे तें स्थान
बकुलच्छायेतलीं विराजे कुटिका सुंदर सान
उपान्त भागीं रम्य वाटिका, हरिणी तेथें एक
वसंत--पुष्पें पवन डोलवी गंधोद्दाम अनेक
नवांकुरवती फुले माधवी चाफाही फुललेला
बकुलाच्या तर गात्रीं गात्रीं धवल फुलांच्या माला

**अजितसिंहः**--( नन्दिनीचा पिता )

कृष्ण--धवल कचभार शिरावर भाव मुखीं गंभीर
कुलवंतीच्या जनक--पदीं शिर अचल लववि नरवीर
बुझलेले व्रण तच्छौर्याचीं चिन्हें शोभति शीर्षीं
राज्यश्रीचें तेज तयाचें दृष्टीला आकर्षी
भव्य शरिर, परि शुष्क जहालें, कष्ट साहिलें नाना
ग्रीष्म ऋतूंतिल सुकलेला तो शैल गमे नयनांना
दोन्ही हातीं उठवुन त्यातें हृदयाशीं लावून
वृद्ध विरागी बोलूं पाहे कंठचि ये दाटून
"धन्य कुमारा ! सौख्याचें त्वां दार उघाडिलें माझें
आशेच्या मम दग्धलतांना जीवन दिधलें ताजें
चिरंजीव तव अभीष्ट पुरवो एकलिंगजी देव
दिली आणुनी पुत्राची मम शील--सागरा ठेव
ही कनिनीका मन्नेत्राची, तारा हृदय--नभाची
माझी नंदिनी तुवां रक्षिली जोड दिली सौख्याची
कुल- कलहानलशामक वीरा ! त्वच्चरिताचें गान
कविजन गातिल रसिकजनांचे सुखवायाला कान
परांस भारी अम्ही परंतू घरांत विग्रहि भारी
भारतवर्षीं याच गुणाची आग पसरली भारी

ते दिन, ते जन, कृति ती स्मरतां कसेसेंच वा ! होतें
कलंक जडतां रजपूताचें रक्त खळाळुन जातें
जमलेले घन वितळुं लागले दुर्दिन मागें गेले
उदितचि होतें 'सत्य' रवीसम, जरि आच्छादित झालें
आम्हांसाठीं तुजवरि संकट आलें अपराधाचें
शांत जहालें, टळलें ऐकुन होइल शमन मनाचें

विहारिणी नंदिनीः—

दो दिवसांचा अचल पाहुणा जाय परत तेथून
निजमन मागें विसरुन नंदिनि--मनास ने चोरून
प्रेमी मन हें कुसुमचि जाणा कोमेजे विरहानें
प्रेम--विरह किति कष्टद असतो प्रेमी जीवच जाणें
चित्तविनोदिनि मुग्ध नंदिनी हरिणीसह उद्यानीं
विहरत होती स्नात कचांना पाठीवर सोडोनी
पुष्पांनीं नच, तिच्याच योगें शोभत होती बाग
बागच केवळ नव्हे, शोभवी ती सारा वनभाग
नेत्रानंदी विहारिणीचें चित्र असें कीं नव्य
शृंगारप्रिय असता कुणि कवि रचिता तिजवर काव्य
गजगामिनि ती मधेंच थांबे विरहाकुल मनिं होई
मनोहराच्या सहवासाची सुखस्मृती तिज मोही

याच लतेचें पुष्प तयांच्या दिधलें मी हातांत
तेंच खोंविलें सस्मित त्यांनीं माझ्या कच--बंधांत
ज्या वृक्षाच्या तळीं घेतली काल अह्मीं विश्रांती
तच्छायातलिं आज गमेना लवहि मनाला शांती
हरिणीचें मुख मृदु हस्तांनीं कुरवाळी वन--बाला
ह्मणे "सखे गे! सरेल केव्हां दुःसह विरह-उन्हाळा?"
पर्णकुटीच्या द्वारीं वाजे कोणाचें पाऊल?
दोन्ही हरिणी नेत्र उभाविती परिसोनी चाहूल

**बंधु--भगिनीः--**

बंधु पाहिला चिंता--रेषा देखे तद्भालांत
सहजेचें मन सहजचि पडलें भयशंका--जालांत
काय जहालें, अनिष्ट बाई ओढवलें कीं काय?
जातां जातां कंटक रुतला शब्द निघाला 'हाय'
बंधु ह्मणे "मी येतच होतों, बाळे! तुज किति घाई!"
मृदु चरणाचा कंटक काढुन हळू उटजिं तिज नेई
तो भाऊ, ती बहीण, त्यांच्या निरागस--प्रीतीला--
पाहुन त्यांचा पिता प्रेमनिधि सुखवी निज दृष्टीला
"नृप--वैभव सुख जरि न लाभलें हें चिर सुख परि राहो
प्रसुला स्मरुनी या सुखदर्शनिं ज्योति विझोनी जावो."

उचलुन धरिला चरण, ठेविला तत्स्कंधावरि हात
भयशंकामय दृष्टीनें ती होति तया पाहात
प्रियंवदा ती पुसे-'तुझें का म्लान वदन वद दादा?"
काय तयानें तिज सांगावें? विषय नव्हे तो साधा

**भयंकर वार्ता:--**

मूक राहिला क्षणभर, नंतर जवळ तिला बसवोनी
तातसंमुखी वार्ता कथितो अधराला चावोनी
"मंडनगडच्या राजाज्ञेनें बद्ध अचलजी झाले
[1]राजप्रतिनिधि देहांताचे शासन ठरवुन घाले !
संकेत स्थळिं दूत पातला मजला सांगुन गेला
कटीस आतां उचित बांधणें रणांगणाचा शेला !
उदेपुराचे वृद्ध मंत्रिजन विरुद्ध या शिक्षेला
आगीचा हा खेळचि केवळ युवराजांनीं केला !"
वार्ता कसची तीराचि शिरला मृदुलेच्या हृदयांत
दु:ख व्याकुल बालमृगीच्या जल आलें डोळयांत
गिरिकुहराचा सिंह गुरगुरे विस्तारुनि आयाळ
तैसा दिसला क्रुद्ध उग्रतर अजितसिंह विकराल !

---

१ उदेपुराचा युवराज उमरावसिंग हा राजप्रतिनिधी होता.

गर्जुन उठला– " अचलासाठीं देहाहुति टाकीन
सूक्तकुलाची चोंडावंशीं ग्रंथी दृढ राखीन
सांग कोणता दिवस ठरविला वधशिक्षेचा त्याचा ?
संपवुं दे हा काळ कलंकी भेकड वनवासाचा
कितिक दिनांची तहान माझ्या शमेल तरवारीची
देवि निद्रिता हसेल उठुनी सूक्तावत कीर्तीची ! "
भग्न--मनोरथ कुमारिकेची चकिता दृष्टि जहाली
ज्वलत्प्रभेची मूर्ति पित्याची न देखिली गत--कालीं

## प्रबुद्ध विचारः–

नेत्र झांकले शांतीचा क्षण सेवियला अजितानें
राजकारणी सुविचाराची माळ गुंफिली तेणें
" मंडनगडच्या तुरुंगांतला उदेपुराचा कैदी
सोडवुनी ने, पुत्र असो तो, त्यास करावा कैदी-
असोत कैसे सबलसिंहजी इतुकेंची लिहितील
पुत्रवधाचें शासन परिसुनि परि धाउनि येतील
ध्वजा भोंवतीं जमतिल त्यांच्या राव तसे ठाकूर
रण कल्लोलीं पडतिल आतां शूरावरतीं शूर
राणाजी जयसमुद्रतीरीं बसले स्त्रैणपणानें
उदेपुराला जागविली रण देवी उमरावानें "

रामपुराला जाउन अपुले सिद्ध करावे वीर
तळहातावर शिरें घेउनी निघतिल संगरधीर
ऐसा ठरला विचार तेथें पितापुत्र दोघांचा
कठोर शिक्षा अवधि तियेला केवळ दोन दिनांचा
आधीं जाउन मंत्र जपावा विजयानें विजयाचा
अजितांनींही दुसऱ्या दिवशीं घ्यावा वेष रणाचा

**अजितसिंहाची राजभक्त प्रजाः--**

रामपूरची प्रजा स्मरतसे अजुनीही अजितास
तच्चरिताची गानपदावलि घोळे तत्कंठास
सुनें राजगृह, शुष्क उपवनें, कारंजीं तेथील
स्मृति चिन्हांनीं तदश्रु गळती विरही नयनांतील
'इथेंच होते राव विराजत वीर--मंडलामाजी
विडे उचलुनी येथुन गेले प्रबल रिपूवर गाझी
रामावांचुन अयोध्याच जणु रामपूर हें झालें
राज्य सोडुनी वनवासाला 'राव' निघोनी गेले
कशास आम्ही शूर ह्मणवितों, वागवितों खड्गाला?
पुत्र तयांचा 'विजय' न सुटला बंदिवान झालेला'

**रामपूरचा आनंदः--**

गेहीं गेहीं रामपुरीं या चालत असतां गोष्टी
पौरजनावरि आनंदाची वृष्टि जहाली मोठी

विजयसिंहजी सुटले सुटले, तोंडी ज्याच्या त्याच्या
घोळुं लागले शब्द, अंतरीं स्फूर्ती उल्हासाच्या
बंधविमोचन कथा तयांना सुखवित होत्या ज्याच्या
एका रात्रीं प्रगट जहाला तोच पुढें सकलांच्या
हर्ष न मावे हृदयीं त्यांच्या विस्तरिला जय--नादें
प्रीतिवचानें तयाच्याच परि तिथें शांतता नांदे
वीरस्वामी वदे प्रभावी रसरसलेले बोल
बोल कशाला हवे? स्वतां ते होते तेजोगोल
"तुमचा भावी राजा, त्याला मुक्त जयानें केलें
प्राणसंकटीं त्यास रक्षणें कर्तव्यचि हें आलें
ज्याच्या संगें तुह्मी संगरीं गाजविलें बहु नांव
बोलविताती तुह्मांस तुमचे अजितसिंहजी राव
चला सोडवूं अचलाला ह्मणिं परोपकृतिवंताला
राणाजीच्या पुढें तन्मुखें निरवूं अपवादाला
करूं समर्पण निजप्रभूच्या पदावरी तरवारी
ह्मणूं दयाळा! अतां पाठवा अम्हास मृत्युद्वारीं
रामपुराच्या यशोध्वजाला कलंक जो जडलेला
दवडावी का दैवें आली जी तत्क्षालन वेला?
तुमचें होतां स्मरण जयांचें हृदय भरोनी येतें
कंठावर कर ठेवुन पुसती वीर कुठें माझे ते!

त्या स्वामीची हाक तुम्हांला बोलविते साह्याला
रजपूतांचे बाहु असावे उद्यत विभु--कार्याला

**रामपूरकरांचा उत्साहः--**

'रजपूतांचे बाहु असावे उद्यत विभु--कार्याला'
या वाक्याच्या सवेंच देखे तो उद्यत--बाहूला
अतुलशक्तिवर वीर निश्चयी वदले जयनिर्धारीं
'मृत्यमुखांतुनि खेंचुन आणूं अचलाला माघारीं
शौर्यश्रीचे भाग्यश्रीचे कुठें आमुचे राव
त्यांच्यासंगें काळावरतीं घेऊं आह्मी धांव

---

## भाग ४ था.

मंडनगडच्या तुरुंगांतील उदेपूरचा राजकैदी पळविणें हा गुन्हा होय. तो प्रत्यक्ष आपल्या मुलानें केलेला असला तरी त्यास धरावा एवढेंच सबलसिंहांनीं [ मंडनगडच्या राजांनीं ] उदेपुरास कळविलें होतें. उदेपूरचे राणाजी जयसमुद्रतीरावर विलासांत मग्न होते. त्यांनीं युवराज उमरावसिंग यास राजप्रतिनिधि नेमून 'पंचोली' नांवाच्या अनुभविक वृद्ध सचिवांच्या साह्यानें त्यानें राज्यसूत्रें चालवावीं अशी योजना लावून दिली होती. उमराव हा तामसी व उतावळ्या स्वभावाचा होता. त्यानें पंचोली दिवाण नाहीं नाहीं ह्मणत असतां त्यास एकदम देहांताची शिक्षा सुनावली !

सबलसिंहानें उमरावाचा अधिकपणा पाहून तो मंडनगडची आपली चौंडावत सेना घेऊन पुत्ररक्षणार्थ धांवून आला. तटाबाहेर तळ देऊन त्यानें उमरावास विनंतिपत्र पाठविलें. उमरावानें त्या पत्राच्या चिंध्या करून त्या लाथेनें तुडविल्या व पंचोली दिवाणाचें ह्मणणें अमान्य करून त्याचा भरसभेंत अपमान केला ! हतभागी अचलाचा शिरच्छेद करण्याकरितां त्यानें तत्काल त्यास राजपथावर आणिलें. असंख्य पुरवासी लोक तें करुण दृश्य पाहून हळहळत होते. इतक्यांत अजितसिंह व विजयसिंह या पितापुत्रांनीं आपल्या ५०० कडव्या लोकांनिशी तेथें अचानक छापा घातला. विजयसिंहानें गर्दीत मारामार करून अचलाजवळ घोडा नेला व चपळाईनें त्यास घोड्यावर घेऊन मार्ग काढिला. तिकडे सबलसिंहांनीं उदेपुरी फौजेवर तुफानी हल्ले चढविले व तिचा अगदीं पराभव केला. पंचोली दिवाणांनीं जयसमुद्रतीरावर स्वार पाठवून ही सर्व हकिकत राणाजींस कळविली. ऐन वेळीं तो स्वार राणाजींचा हुकूम घेऊन आला

कीं, " अचलसिंहास देहांत शिक्षा न देतां इकडे पाठवावें. युवराजाचें राजप्रतिनिधिपद रद्द करून तो अधिकार तूर्त पंचोली दिवाणास दिला आहे. " या पत्रानें सर्वांस आनंद झाला. परंतु या राजाज्ञेनें उमराव हा पितृद्रोही बनून आजोळी गेला. तेथील फौज घेऊन तो कुमळमेर किल्ल्यावरील राणाजींचा खजिना लुटण्यास धावला !

## मंडनगडावरील खळबळः-

मंडनगड गडबडून गेला अचलाच्या शिक्षेनें
ज्वलाद्रिरिच कीं विवृत जहाला भीषण भूकंपानें
तद्घोषानें तत्प्रांताचें प्रचंड सामर्थ्याचें
धावत आले समरोत्साही योद्धे बलधैर्याचे
द्वार-गडाचें जों न उघडलें सिंह उफळले तोंच
सुचवी त्यांची वदनश्री कीं हृदयीं पडली खोंच
गडावरोनी उतरूं लागले सबलसिंहजी जेव्हां
क्रोधी विव्हल भाव तन्मुखीं स्पष्टचि दिसले तेव्हां
वरिवरांना स्फुरवूं लागे आवेशें तत्कंठ
परिसत होते कढलेले वच सैनिकही सोत्कंठ
" बद्ध करावा अचलाला " मी इतुकें लिहिलें होतें
अविवेकानें उमरावाच्या भ्रम झाला बुद्धीतें
घरांतला जो दीपक त्याचा चटका बसला थोडा
कोण तयाला विझवुन टाकिल ऐसा आहे वेडा ? "

वाढत गेला कंठ तयांचा-"अचल जरी अपराधी
मृत्यूला तो पात्र नव्हेची, शासन हें हटवादी
माझा तर तो कुमार सगुणी, तुमचा भावी राजा
त्यानें केला अजवरि केव्हां आज्ञाभंग न माझा
काय तयाला कारण न कळे उन्मार्गी होण्यास?"
वच हें वदतां त्यांचेची मन खाउं लागलें त्यास
काय कुणाचा वंश--च्छल म्यां केला अन्यायानें
फळ त्याचें तर नाहीं ना हें? प्रभु तो एकच जाणे
अनुतापानें सबलसिंहजी, समक्ष तैं सकलांच्या
गद्गद वदले--'सोंपवीन हें राज्य करीं अचलाच्या
तदीय मोचन करुन तयाला जयसागर–तीराशीं
नेउन त्यासह विजयी अर्पिन खड्ग प्रभुचरणाशीं
चंड तनुची चोंडावत–चमु, तिच्यांत खळबळ झाली
महीस कंपित करुन निघाली सेना विक्रमशाली

## अचलाचा वधदिनः--

तो दिन उगवे, ज्या दिवशीं कीं उदेपुराचे लोक
अचलासाठीं करीत होते अंतर्हृदयीं शोक
उत्तरभागीं मंडनगडच्या प्रबल चमुचा गोट--
पाहुन जो तो ठेवुं लागला विस्मित हनुवरि बोट

प्रशंसिति बहु, निंदिति कांहीं लोक सबलसिंहातें
कोणी ह्मणती अग्नि लावीला उमरावांनीं हातें

## शेवटची राजसभाः--

राजमहालीं परिषद भरली दाटी तेथें झाली
एकच होतीं मान ताठ, परि कितिक पाहती खालीं
वयोवृद्ध निजराजहितेच्छु 'पंचोळी' सचिवांनीं
स्तब्ध सभेची दृष्टि ओढिली प्रगल्भ निजवचनांनीं
"राजकुंवरजी ! अजून ऐका या वृद्धाचे बोल
गेला नाहीं तोल जोंवरी, धरा सांवरुन तोल
नवसाचा हा मंडनगडच्या राजकुलाचा कोंब
तद्वध उठविल गादी पुढतीं आगीचा हो डोंब
अचल बोलला न्यायमंदिरीं-'अजित-विजय निर्दोषी
जा शपथेवर पुसा पित्याला, मी न कुणाचा दोषी !'
निर्भय वक्ता अचल, तयाचा प्रत्यय समुचित घ्यावा
न्यायदेविला कलंक लागे धुवून तो टाकावा
मला वाटतें उज्वल भरलें सत्य तदीय वचांत
निर्णय त्याचा करून घेऊं पिता-पुत्र दोघांत"
सभेंत येई सबलसिंहजीकडील अनुचर एक
दिला लखोटा, ज्यावर होता नृपभक्तीचा लेख

वाचुन त्याचे तुकडे केले फेकुन दिधले खालीं
ह्मणे- 'धन्याला सांग सुताची घटिका पूर्ण जहाली!'
हुकूम सुटले, विडेहि दिधले प्रमार राठोडांना
अविवेकाचा विषाद गमला तैं थोरा थोरांना
भिडतिल बाहू, उडतिल ठिणग्या, पडतिल वीर रणांत
सुजाण होते खंत तयांच्या ये अंतःकरणांत
शत्रुमर्दनीं कृपाण व्हावे उद्यत रजपूतांचे
रुधिर प्राशन करावया ते सिद्ध आज आप्तांचे !
धर्मासाठीं लढावयाला जे व्हावे उत्कंठ
सज्ज जहाले स्वजनांचे ते कापायाला कंठ !

## अचलसिंहाची सुटकाः—

वेशीवरती वाजति वाद्यें, पुरांत वध-देखावा
विलोकुनी तो वज्र--हृदयींही करुणेचा द्रव यावा
किरण-स्वामी भास्कर तळपे मध्यान्हीं आकाशीं
वधार्थ हा ! हा ! राजपथावरि आणियलें अचलाशीं
द्वार-गवाक्षें विवृत जहालीं, पदर जहाले ओले
संगर-विद्यापटुहि जनांचे भरून आले डोळे
हळहळणाऱ्या मूक जनांचे अस्फुट निघती शाप
'राजकुमारा ! निर्घृणतेचें बाधो तुजला पाप'

बा ! निर्दोषी अचला खालीं मान नको तूं घालूं
कारुण्यानें हृदयें फुटलीं कण कण झाली वाळू
विलापजनक प्रसंग असतां नवल जहालें तेथें
धावत आले स्वार पांचशें आकस्मिक समयातें
घोड्यावरच्या प्रभावशाली वीरवरांचा छापा
ज्या त्या वदनीं शद्ब उमटती 'मारा, तोडा, कापा!'
फळी फोडुनी काय पातले मंडनगडचे वीर
कुणि ह्मणती- 'छे! रामपूरचे सूक्तावत हे धीर !'
अजित-विजय हे प्रगट जहाले या विस्मय--वार्तेनें
खळबळ झाली, होते जैशी वनिं झंझावातानें
अचलाजवळीं विजय पोंचला बाणासरसा नीट
अश्वीं चढवुन त्यासह उसळे संकटमोचक धीट
विरोधकांचे खड्ग उसळतां वक्षीं घुसले भाले
विदीर्ण झाल्या कवचा कांहीं लाल जहालीं भालें
हाँ हाँ ह्मणतां स्वार निघाले बहु चपळाई केली
प्रभंजनाची लहरि जणो कीं कदलिवनांतुनि गेली !

## सबलसिंहाचा रणकल्लोळः—

तिकडे केला कहर भयंकर मंडनगड-वीरांनीं
उमरावाच्या उतरुन गेलें उन्मादाचें पाणी



॥ जिद्द पेटली, हटे न कोणी, चाले मारामार ॥ तरवारीच्या खण नादीं तीरांचा झंकार ( पान ४३ )

घायाळांना पुरल्या नाहिंत उचलायाला डोल्या
जिकडे तिकडे हृदयविदारक योध्यांच्या आरोळ्या
जिद्द पेटली हटे न कोणी चाले मारामार
तरवारींच्या खण खण नादीं तीरांचा झंकार
घोडदळाची फळी बांधुनी सबलसिंह वेगानें
हल्ले चढवित भेदित होते सेनातट निकरानें
निजपुत्राची करिन मुक्तता, मग होणारें होवो
निश्चय-सागर तुफान झाला, विश्व बुडोनी जावो.
शिरापासुनी कोणी तुटला, कमरेपासुन कोणी
एक उडाला पाय कुणाचा, हात कापले दोन्ही
हाडा—वंशी भीमबहाद्दर कच्छवाह जातींचे
वाढत गेले पाउल पाउल सेवक रणभूमीचे
हत्यार राहुन वेशीवरती झोटधरण जें होय
तेव्हां नव्हती मरणावांचुन निभावणीची सोय
ओळख नुरली, मनीं बेदिली, कचाकचीचा खेळ
जो तो साधी सांपडलेली अवसानाची वेळ
मंडनगडच्या कंठिं जयश्री घालित असतां माला
राणाजीचा दूत लखोटा घेउन वेगें आला
राजाज्ञा कीं, "मुळिं न वधावा अचलसिंह सोडावा
सबलसिंहजी-सवें युवक तो इकडेची प्रेषावा

युवराजांनीं अधिकारी–पद सोडावें तात्काल
पंचोलींना दिधलें तें पद विझवावा हा जाळ ”
राजाज्ञेनें खंडित केलें मूळ रक्तपाताचें
अपमानानें चिडून गेलें मन परि उमरावाचें
कळे तयाला अचलमुक्तता विजयानें केलेली
खंड खंड तन्मती जहाली, शिला घसरली शैलीं
गंधक पेटे, स्वतांच वितळे, तैशी तद्गति झाली
आग न विझली वाढत गेली डोळ्यामधली लाली
पापाचें फळ हें न संपलें तों दुर्बुद्धि ग्रासे
बुडल्याचा पद खोलांतचि, हें सत्य सुभाषित भासे
जनकद्रोही होय, जाय तो आजोळीं उमराव
तेथिल कांहीं, अपुले कांहीं मेळविले उमराव
प्रदीप्त केवळ मशाल होती, तिला मिळालें तैल
कुमळमेरच्या वाटेवरतीं तिचा उफाळे जाळ
त्या किल्ल्यावर मेवाडाचा खजिना होता भारी
त्यावर केली हर ! हर ! यानें अविवेकानें स्वारी.

## भाग ५ वा.

नंदिनीचा पिता व भाऊ अचलसिंहास सोडविण्यास गेले होते. नंदिनी कुटिकेच्या द्वाराशीं त्यांची वाट पहात बसली होती. पिता व बंधु यांसह अचलसिंह सुटून आलेला पाहतांच तिला आनंद झाला.

नंदिनी नदीवर पाण्याला गेली असतां तेथें अचलसिंहाची तिची गांठ पडली त्यानें तिजजवळ आपला प्रेमभाव व्यक्त केला. तिनेंही आपला अनुराग दर्शविला. इतक्यांत विजयसिंह येऊन त्यांनें सबलसिंहांनीं उमरावाचा उदपुरास पराभव केल्याची आनंद-वार्ता अचलसिंहास कळविली. पुढें पितृद्रोही उमरावानें कुमळमेरावर स्वारी केल्याची बातमी त्या दोघांसही दूतांकडून कळल्यामुळें ते त्याला अडविण्याकरितां आपलें सैन्य घेऊन धावले.

### पथविलोकिनीः—

कुटजद्वारीं पांथविलोकिनि संचित नंदिनि बैसे
धावे तन्मन विविध विचारीं पर्ण जलौघीं जैसें
अभ्रामधली इंदुकला, कीं पुसट इंद्रधनु—रेखा
ती युवती कीं उष्ण ऋतूंतिल उदास वसुधा देखा
अचलाचा तो वध—दिन तिजला सुखद कसा वाटावा
करित होती मुग्धमनानें जगदंबेचा धावा
जनक भ्राता दोघे गेले तद्रक्षण करण्याला
हिरवळ होती मात्र तेवढी तप्त तिच्या जीवाला

आश्रमहरिणी तिची सखी, तिज टक लावोनी पाही
तिला विचारी शुभशकुनाच्या गोष्टि मुखानें कांहीं
बकुलाचीं जीं फुलें गळालीं तीं वेंचोनी घेई
समविषमांच्या संख्यागणनीं शुभाशुभाला पाही
भावशील मृदु मानस असतें स्वभाविक ललनांचें
पर्ण जणो लुललुसीत जाणा कदलीच्या गाभ्याचें
सन्मुख शाखा, तिजवर दिसली कपोतिका बसलेली
नेत्र झांकते, पुन्हां उघडिते, तोल पुढें सांभाळी
तत्प्रिय येई घेत भरारी तदा कलध्वनि झाला
उभयांचे तैं चंचु मिळाले, दृश्य रमवि बालेला

## स्वजन--भेटः-

त्या दृश्यीं मन रमलें असतां ऐकूं आल्या टापा
दिसले कांहीं स्वार जयांचे अश्व टाकिती धापा
जनक-सहोदर दोघासंगें प्रणयी दिसला तीतें
बागच फुलला, दृष्टि मिळाली जेव्हां तत्दृष्टीतें
ताताजवळीं द्रुतगति गेली कलहंसी प्रेमानें
'घाव नाहिं ना कुठें लागला' ? पुसते आतुरतेनें
शोणित-रंजित दिसले तिजला अचल-विजय दोघेही
त्रिकलेच्या झणि मुखीं निघाला व्याकुल शब्द 'अगाई'



आश्रमहरिणी तिची सखी तिज टक लावोनी पाही [ पा. ४६ ]

ज्येष्ठ भ्राता सन्निध जाउनि भगिनीतें समजावी
'हें शत्रूचें रक्त, न अमुचें, शंका तुजसि नसावी'
समाधानता उदीर्ण होई कृतज्ञ अभिरामेची
टळला घोर प्रसंग बाई कृपाच जगदंबेची
जीव मनोमनिं दोन हांसले प्रणयाच्या दारांत
मर्यादेनें शब्द तयांचे रोधियले ओष्ठांत
प्रासादाचें सुख त्या दिवशीं अवतरलें कुटिकेंत
प्रणयिजनांचें सुख परि चढलें स्वर्गाच्या तुलनेंत

जलभरणः—

प्रभातसूचक शीत समीरण वाहे मंद गतीनें
प्रबोधनाचा काय सोडिते सृष्टि श्वास मुखानें
शैलवनीं त्या लतेलतेच्या तळीं सुमांच्या माला
रंगवल्लिका जणु वनदेवी-संघ काढुनी गेला
जलतीरावरि तीरतरूवरि बागडती खग मोदें
दैववती कुणि असेल, गाती तद्वाणी आनंदें
हिरव्या रानीं पिवळी पिवळी कांती रवि--किरणांची
तींत पाडसें गोजिरवाणीं संचरती हरिणांचीं
वाहे जेथें खळ खळ खळ खळ ओघ स्फटिक जलाचा
फुटला होता कोषच केवळ शुभ्र शुभ्र मोत्यांचा !

त्या मोत्यांना नन्दिनि होती सांठवित कलशांत
जानूमध्यें परिकर धरिला, मुद्रा होती शांत
लवलेली ती नितंबिनी कीं रम्य केतकी शाखा ?
वेणी--भुजगा कृष्ण उतरली जल प्यायास विलोका
मध्यवर्तिनी रुचिर कल्पना तिच्यांतुनी कवितौघ
तशी दिसे ती, तत्पदिं वाहे खळाळुनी सरितौघ
स्वस्तिक--रेखा वनलक्ष्मीच्या रम्य उत्तरीयाची
जगत्संसृती तिच्यांतील कीं माया जगदीशाची
नंदिनि हांसे पर्वत नंदिनि हांसे फेन मिषानें
सौंदर्याचा प्रेक्षक पाही संगम तल्लिनतेनें

**प्रणयी**:--

घागर भरली, प्रमदा वळली, दृष्टि वरि जों गेली
तत्क्षणिं तनुसह दिसे मनोज्ञा लज्जेनें लवलेली
कांपत होतां हात घटाचा गोंडस गौर सपीत
अचल सरोनी पुढें तयानें धरिला तो हातांत
दोन करांच्या स्पर्शें शरिरीं वीज चमकुनी गेली.
तिथें स्तब्धता विराजलेली अचलें विलया नेली
वदे--" नंदिनी कोमलतेला असह्य हा जलभार
माझ्या शीर्षी तुझ्या सुखाचा सतत असावा भार

कारागेहीं मृत्यूची मज चिंता शिवली नाहीं
नेत्रापुढुनी तुझी मंगले ! मूर्ती ढळली नाहीं.
पिता-सहोदर तुझे स्वजन गे! शालिनि ! त्या दोघांनीं
वधस्थळीं मज विमुक्त केलें समयाला साधोनी
न तरि तुझ्या शुभ दर्शनास मी अंतरतों हतभागी
मनोहारिणी ! कैची घडती गाठ तुझी या जागीं
युद्ध न सरलें, घोर यादवी या पुढतीं माजेल
तरवारीच्या धारेवरती दैव विकट हांसेल
यशोरूपिणी ! रणदेवीला जागविलें तुजसाठीं
नरमुंडांच्या अर्पिन माला रणांगणीं तत्कंठीं
सूक्तकुलाच्या उद्धारास्तव चोंडावत-कुलतेज
प्रकट दाखविल छलक जनांना रणभूमीची सेज
बाहु स्फुरतो, केव्हां येइल न कळे हाक रणाची
जी घडि जाते ती शांतीची या दर्शन-कालाची
मनोदयाच्या निवेदनाचें स्थान एक तूं माझें
निवेदनाविण जाणशील कां चतुरे ! इंगित माझें
इतुकें बोलुन भाव--निदर्शक रसिक तिला जों पाही
लज्जापटलामधून हंसरी वीज लकाकुन जाई
प्रणयि मनाचे भाव जाणती ललना शद्वावीण
मुग्धावस्था स्त्रीहृदयाच्या प्रीतीची ही खूण

भाग्य हांसलें, वसंत फुलला, कुसुमित वृत्ति जहाल्या
सद्रसिकाच्या कंठीं प्रणयी लहरी उसळुन आल्या
पुन्हां वदे तो--" मनोरथांची कल्पवल्लि तूं साची
होशिल ललिते ! युवराज्ञी का वद मंडनदुर्गाची ?
विक्रमशाली वंशक्षेत्रीं तूं संयोगीभूमी
होशिल तरि गे ! दोघे राहूं चिरकीर्तीच्या धामीं
मुग्ध सारिके ! अनुरागाचा ऐकाया तव बोल
कर्ण जहाले आतुर, माझा जीव जहाला लोल

**प्रणयिनीः--**

हरित तृणाच्या सृष्टिपटावरि उभी सरस्वति होती
सरिता उधळी मौक्तिकमाला मधुनि मधुनि पाहे ती
मंदसमीरें भालप्रांतीं रुळणाऱ्या अलकांला
सारित होती अलकावति जणुं कमलाच्या भुंग्यांला
किंचित् वरती निरखुन विनया पुन्हां अधोमुख होई
रसिका--वचनीं नवी माधुरी द्राक्षलतेची येई
" वीरभूषणा ! पुण्यदर्शना ! प्रसून मच्चित्ताचें
वाहुनि केलें पूजन पूर्वीं म्यां युष्मच्चरणांचें
महत्संकटीं जिच्या तनूला दिला तुम्ही आधार
कंठिं कुणाच्या तरी पडावा तिच्या कराचा हार ?

४२८९ दा. क्र.

आपत्ती जरि ओढवल्या तरि उपकृति केली वंशीं
विस्मृति व्हावी देवतुल्य मज चरिताची तरि कैशी ?
घन, सौदामिनी, वरुण, शीतकर समक्ष वरिलें जीतें
अनुरागानें धन्यचि केलें सद्गुणशीला ! तीतें
रजपूतांच्या कुमारिकांचें प्रीति--व्रत बहु दिव्य
इतिहासाच्या पृष्ठीं पृष्ठीं चित्रें नटलीं भव्य !
पावित्र्याचा संचय माझा विजय तुम्हांला देवो
त्रिपुरसुंदरी सौभाग्याचें अभंग मंदिर ठेवो

**मित्रद्वयः--**

दुरून दिसला ‘ विजय ’ विराजे यद्वदनावरि हास्य
उमरावाच्या अपजय–कथनीं करि यद्भ्रुकुटी लास्य
त्यास पाहतां चपला घेई कटिवरि घट उचलून
अचल--कन्हय्या पाहत असतां गोपी जाय निघून
प्रथमोत्साहें विजय म्हणाला “ हेरांनीं कळवीलें--
उमरावाला सबलांनीं रण सोडवुनी पळवीलें ”
त्याचा कर निजकरांत घेउन अचल हांसला मोदें
कुटजीं गेले कीर्ति--सखीचे भजक, रमत संवादें

**स्वदेशभक्तांची तयारीः--**

दुसऱ्या दिवशीं अद्भुत वार्ता दूतांची परिसून
राजभक्तिमय वृत्ति तयांच्या गेल्या हो ! उसळून

कुमळगडावरि उमरावाची दुष्ट चढाई झाली
तिघे ह्मणाले "खड्ग न सुकलें चढेल त्यांवर लाली !"
शूर जनांना कथणें नलगे समयाचें माहात्म्य
स्फूर्ति घडविते समयीं समयीं कार्याशीं तादात्म्य
राजद्रोही राजसुताला मार्गी अवरोधाया
मेवाडाला स्वराज्यनिष्ठा सजले ते दावाया
गिरिवासिनि निजचमूस गेले अजितांचे संदेश
वीरांच्या कटिवरतीं चढला खड्गांचा परिवेष
अचलाचेही वीर लढाऊ येउन मिळती त्यास
भ्रमरांचे कीं थवे पातले शोधित त्या बकुलास
विक्रमशाली रजपूतांनीं गजबजला गिरिराज
संचरलेलें जडांत दिसलें चैतन्यहि तें आज
प्रळयसमुद्रीं उडी घालुनी देतिल जीव जिवाला
असे राखिले प्रबल वीर-वर अजितांनीं साह्याला
चमुपति दोघे चमुसह उठले गंभीर ध्वनि झाला
भूकंपाचा नाद विदारित गेला दिक्पटलाला
खिंकाळोनी अचलाचा हय टापा उडवित होता
वळली त्याची दृष्टि एकदां मागें, जातां जातां !
प्रभंजनाचे झोत मिळाले अचल--विजय जणु दोन्ही
कुमळमेरचा मार्ग बुडाला नव धूलींच्या डोहीं

## भाग ६ वा.

राजपुत्र उमरावसिंग यास अचलसिंह व विजयसिंह या दोघा संग्रामधुरंधरांनीं कुमळमेरच्या वाटेवरील जिलवाड्याच्या बारीजवळ गांठलें. तेथें दोन्ही दळांचें तुंबळ युद्ध झालें. अचल व विजय या दोघांचीं सैन्यें उमरावाच्या सैन्यसंख्येपेक्षां कमी होतीं. ऐन गर्दींत ते दोघेही प्राण संकटांत सांपडले असतां ऐनवेळीं सबलसिंह व अजितसिंह हे दोघांचेही जनक कुमकेस धावून आले. मात्र सबलसिंहांनीं विजयास व अजितसिंहांनीं अचलास त्या संकटांतून सोडविलें. राजपक्षाचे इतरही राव, ठाकुर मागून येऊन मिळाले व त्या सर्वांनीं उमरावाचा मोड केला.

नंतर राणाजी व उमराव यांच्या एकलिंगजीच्या देवळांत भेटी झाल्या. तेथेंच अजितसिंहावरील फितुरीच्या दोषाचें निराकरण झालें. याची हकिकत अशी होती कीं, देसोरीच्या युद्धांत मोगल सरदार दिलीरखान यानें रजपूत आटोपत नाहीं असें पाहून अशी युक्ति योजिली कीं, सबलसिंह व अजितसिंह या दोघांच्या नांवाचीं त्यानें पत्रें तयार केलीं " तुम्ही कबूल केल्याप्रमाणें ऐनवेळीं आपणास येऊन मिळावें, वेळ हीच आहे " असा त्या दोन्ही पत्रांत मजकूर होता. मात्र अजितांचें पत्र सबलांच्या हातीं व सबलांचें पत्र अजितांच्या हातीं पडावें अशी त्याची योजना होती. त्याप्रमाणें सबलांच्या हातीं पत्र पडलें त्यामुळें ते शंकित झालें व त्यांनीं कच खाल्ली. या कारणानें मोंगलाचा जय झाला. अजिताकडे पत्र घेऊन येणारा जासूद येतां येतां गर्दींत ठार झाला. कांहीं दिवसांनीं पितृदुःखानें वेडा झालेला या जासुदाचा मुलगा फिरत फिरत मंडनगडास आला असतां त्याच्या जवळ असलेलें तें अजितांच्या नांवाचें पत्र अचलसिंहाच्या हातीं पडलें. तेव्हां दिलीरखानाचा कावा त्याच्या लक्षांत

आला. व तें पत्र त्यानें आपल्या बापास दाखविलें. सबलसिंहांनीं आपणास मिळालेल्या पत्राच्या आधारें अजितसिंह मोगलास फितुर झाल्याबद्दल उदेपूरच्या राणाजीचें मन अगदीं भारून टाकलें होतें. व त्यांच्याच आज्ञेनें अजिताचा मुलगा विजयसिंह यास कैद करून मंडनगडावर ठेविलें होतें. बिचारा अजितसिंह मात्र नंदिनीसह अरवली पर्वतांत जाऊन राहिला होता. वास्तविक मुलानें दाखविलेल्या पत्रानें सबलसिंहाची खात्री व्हावयास पाहिजे होती, परंतु व्यक्तिविषयक मत्सरानें त्यास ग्रासिलें होतें.

हा प्रकार एकलिंगजीच्या देवळांत उघडकीस आला. सबलसिंहांनीं राजसंन्यास घेतला. अजितांनीं सर्वांसमक्ष आपली कन्या नंदिनी हिचा हात अचलाच्या हातांत दिला. पुढें उदेपुरास राणाजींच्या समक्ष त्यांचें लग्न लागलें. अजितसिंह हे पुन्हां आपल्या रामपूरच्या संस्थानाचे अधिपती झाले.

## कुमळमेरः—

अजस्र भारी अजिंक्य होता कुमळमेरचा किल्ला
दिधले वेढे यवनांनीं परि वदले ' अल्ला ! अल्ला ! '
प्रतापराणा नर—केसरि जो, गुहा तयाची हीच
दिल्लिपतीच्या वीरमण्यांचा खच पडला येथेंच
तो गढ केवळ मेवाडाच्या शीर्षावरची ढाल
बोथट झाले घाव घालुनी शत्रूंचे करवाल
भूप अरवली, हा गढ त्याच्या द्वारावर रणशूर
करी पहारा विशालदेही दृष्टि रोंखुनी दूर

कुमळमेरचा खजिना लुटणें गोष्ट न ही सामान्य
सिंह—मुखांतिल कवल काढणें होइल कोणा मान्य ?

युद्धारंभः--

दौड पोंचली झुंझारांची युद्धोन्मुख होऊन
राजसुताच्या पथास धरिती अचल-विजय रोंखून
जिलवाड्याची बारी तिचिया तोंडीं दोन्ही सेना
उमरावाचे ढालाइत किति ? तद्गणती करवेना
दाताखालीं ओठ दाबुनी तो दावी निजकोप
इकडे होतें नृपभक्तिचें भरलें तेज अमोप
त्यास वाटलें चुकून दोघे सांपडले वाटेंत
उडिद मानुनी मिरींच सजला रगडाया दांतांत
पूर्वक्षितिजीं सविता पाही अर्धें मुख काढून
उद्यत दिसलीं दोन दळें तीं तरवारी उपसून
शिंग तुतारी वाजुं लागल्या फुरफुरले रजपूत
मानव होते, कीं काळाचे कराल होते दूत ?
तीर कमानी सजून आल्या बारीच्या तोंडाशीं
दोघे सरले किंचित् मागें, युक्ति जुळे शक्तीशीं
अर्धा आला सांप बाहिरी तोंच घातला घाव
स्वार धावले धनुर्धरांवरि सुक्तावत भरधांव

धारा--सागर त्यांत बुडाल्या नौका वीर–तनूंच्या
थडकुं लागल्या लाटेवरती लाटा बलशौर्याच्या
सर्वच आली फौज निघोनी जेव्हां उमरावाची
भू–लिंगावर होउं लागली वृष्टी रक्त--जलाची
कालींची जणुं रसना गमली 'विजया'ची तरवार
'अचला'चें ही खड्ग भासलें प्रळयकाळची धार
अवसर नव्हता विश्रांतीचा तिथें उसासा घ्यावा
कर्तृत्वाविण गेला नाहीं एक क्षणही वाया

**सबलसिंहाचें साह्यः--**

दुरून दिसला नभीं धुरोळा, आशा पाहूं लागे
मंडनगडचे स्वार पोंचले पवनगतीच्या वेगें
उत्साहाची आनंदाची तदा गर्जना झाली
राजस्थानीं वीर–रसाची कविता हंसली गालीं !
सबलसिंहजी नवी चढाई करून घुसले आंत
विजयाभंवती नाचत होते तरवारीचे हात
शुद्धि न उरली, त्यावर केली निजदेहाची ढाल
शत्रूचे करि मित्र, असा जो धन्य असो तो काल
दु:खाश्रूंना ढाळित होता जो सबलांच्या गेहीं
त्याचे झाले सबलसिंहजी संरक्षक निजदेहीं !



धनंजयाचा कुमार अजि कीं कुरुसेनेंत बुडाला. ( पान ५७ )

**अजितसिंहः--**

साळुंब्याचें निशाण थटलें, अजितसिंहही आले
गनोरपुरचे गाझी भिडले सरसावोनी भाले
बिजलीपुरचे डंके वाजति, साद्रीच्या रणभेरी
पराजयाचे लेख वाचती कुमळमेरचे वैरी
थिजलें नव्हतें रक्त अजोनी उफळत होतें अंगीं
सजावतींचे हल्ले चढले रणरंगीं चतुरंगी
डोईचे शिरपेच ढळाले, तुटति गळ्याचे हार
रणपर्यंकीं कितीक निजले थोर थोर सरदार
सडाच होता पडत महीवर रक्ताचा मांसाचा
गृध्र–निशाचर–वृक–तरसांचा दिन तो आनंदाचा

**अचलसिंहाचें प्राण संकटः--**

बुंदीवाले वीर हटेले अचलाला घेरून
घेउं लागले समर-परीक्षा तत्संमुख होऊन
पर्वत–शिखरीं चहूंकडोनी मेघ जसे वळतात
तीर्थस्थानीं स्वर्गपदेच्छू कीं जैसे जमतात
चंदन तरुवरि भुजंग अथवा दीपाभंवतिं पतंग
औदुंबर–फल त्याच्या भंवतीं किंवा कीटक–वृंद
तैसा गमला समूह त्यांचा, तत्कल्लोल जहाला
धनंजयाचा कुमार अजि कीं कुरु–सेनेंत बुडाला ?

शीर्षामधुनी वाहत होती व्रण—रुधिराची धारा
सूर्य-सारथी केवळ गमला, अरुण देह तो सारा
शौर्य-कलेची सीमा झाली, तोंडीं आला फेस
झुंज चालवी बहुशक्तीशीं शक्तीचा अवशेष
तीक्ष्ण-असींच्या भव्यमंडपीं जिभेस चाटी काळ
जिलवाड्याच्या रणदेवी गे ! तोल तुझा सांभाळ
यशः--कांक्षिणी आराधित कुणि असेल जगदंबेला
तद्भक्तीचें पुण्य करो तें सहाय या अचलाला
प्रभावतीच्या मनोरथांची तुटेल मोहनमाळ
भविष्य भीषण-रूप दाखवी क्षणोक्षणीं विकराल

## अजितसिंहाचें साह्यः--

कोण जिवाचा धडा करोनी धावे हा अभिमानी
धन्य अजितजी ! गाइल तुमचीं गीतें शाहीर-वाणी
विस्मृति ज्याची व्हावी न कधीं ऐसें कंदन माजे
भरून गेले असतिल गगनीं स्वर्गाचे दरवाजे
स्वर्ग- मेदिनी दोहोंमध्यें खड्ग आडवें मात्र
खड्गाची जणु धारा गमली स्वर्गगेचें पात्र
कोंडीमधुनी अचल सोडवूं संकल्पचि हा अजितांचा
तो तर बनला तीर्थंकरची मृत्यूच्या वाटाचा

निधडे निधडे धडकीलाही पुरले नाहींत त्यांच्या
रजपूतांच्या लिहवतील का लीला सरमिसळीच्या ?
प्राणांचा तट उभारुनीया गलोल बांधोनिया
आणियला तो विजय--मोहरा नौबत ठोकोनिया
कृतज्ञतेच्या उद्यानांतिल कदंब फुलेले दोन
परिमल त्यांचा सुखवि मानुषी मनास आकर्षून
सबलांनीं विजयास राखिलें अजितांनीं अचलाला
दोघे भेटीवीण विसरले समरीं निज--वैराला

**उमरावाचा पराजयः--**

लढेल कुठवर ? उमरावाचें क्लान्त जहालें सैन्य
विमार्गगामी कृतकर्मांनीं अनुभवताती दैन्य
दिनकर आला माथ्यावरती थांबेना तरिहि धुमाळी
प्रत्येकाचा देह शोणितासवें स्वेदही गाळी
राजपक्ष तर नूतन--साह्यें हटातटाला पेटे
विपक्षियांच्या गळ्याभोंवतीं पाश तदीय लपेटे
पुढें मृत्युशीं गांठ, मागुनी वाट नसे जायाला
पापाचा घट भरतो तेव्हां कोणि न ये साह्याला
राजसुताचें धैर्य गळालें फाटुन गेलें उर
रोंखुन धरिती मार्ग मागचा बिजौलिचे ठाकूर

अनुतापाचें दुःख मनाला मदमत्ताच्या दाही
' युद्ध थांबवा ' पराजयाचें निशाण हतबल दावी
दूत–मुखानें सुचवी ' झालों जनकाचा अपराधी
रोष तयाचा शमवुन घडवा तद्दर्शन मज आधीं
घडेल दर्शन, करीन याचन लववोनी शीर्षाला
सिंधु दयेचा घेइल उदरीं दोषांच्या सरितेला,
बिजलीपुरच्या भूपें केली विनती राणाजीची
एकलिंगजी--मंदिरिं ठरली भेट पिता–पुत्रांची

## एकलिंगजीचें मंदिरः--

अरवलि–शिखरीं रजपूतांचें पवित्र मंदिर शोभे
निसर्ग--शोभा पाहुन जेथिल नास्तिक-मनही लोभे
हरित--तरूंच्या जिकडे तिकडे दिसती सुंदर माला
त्यांतचि कोठें प्रपात उडविती मौक्तिक--जलबिंदूला
येथें गुंफा, तेथें गुंफा किलबिल ऐकूं येई
जणो सुमावलि निजगुण--विकसन पाठ जगाला देई
खोल गव्हरें, हिरवी छाया तेथें संतत राजे
हृदय असावें असेंच त्यांचें, थोर जहाले जे जे
क्षुद्र मानवी विकार होती अस्तंगत गिरि–धामीं
उदात्ततेचे प्रगटित होती अंकुर अंतर्यामीं

भूलोकाचे नव्हतचि आपण ऐसा होतो भास
इथें रहावें, पुन्हां न जावें मनास लागे आस
सुवर्ण--रंजित कळस जयाचे आकर्षिति नेत्रास
शिव--मंदिर तें, त्यासह गिरि तो मूर्तिमंत कैलास
उद्यत--किरणें शिवलिंगाला नमन करी रवि–राज
चालवितो जो चराचरावर सुखकर निज–साम्राज्य
पाप--विमोचन करुणासागर कैलासाचा राणा
हिमालयाहुन येथें ये कीं सुखवाया भक्तांना

## पितापुत्रांची भेट:--

शौर्यगुणाचे मानधनाचे सत्यप्रिय रजपूत
तदैक्य घडलें इथें आजवरि साक्ष त्यास अवधूत
सत्यनिवेदन द्वेषनिवारण झालें शिवभवनांतीं
प्रेमग्रंथी दृढतर झाल्या नवीन जुळलीं नातीं
एकलिंगजी ! तुझिया मंदिरिं आजहि आले दास
भक्त–दयाळा ! तपोनिमीलित उघडावें नेत्रास
उदेपुराच्या राजश्रीला शीर्षी भूषविणारा
दर्शनमात्रें प्रजाजनांचीं हृदयें हांसविणारा
बद्धांजलि जयसिंह लवविता शिर गिरिजानाथाला
अपराधी सुत दो हातांनीं धरितो तच्चरणांला

तन्मुख दिसलें मात्र एकदां, चरणीं लवली मान
शद्ध नुमटला अश्रु गळाले चरणावरती दोन
त्या दृश्यानें कठिनहि हृदयें वात्सल्यांत बुडालीं
काय लिहावी जनकस्थिति ती माया साश्रु जहाली
नेत्र पुसोनी उठवि सुताला गद्गद वदला बोल
" राजकुंवरजी ! निजचरिताला व्यर्थ लाविला बोल
वंश कोणता ? पुत्र कुणाचे ? विचार केला नाहीं
मेवाडाची प्रजा, तियेचा दोषी झालों मीही
तुच्छ लेखिलें बुधांस, केला भंगहि जनकाज्ञेचा
सूर्यकुलीं का विसर पडावा रामाच्या चरिताचा ?
असंख्य पडले वीर रणीं जे, त्यांचीं विरही गीतें
गातिल ललना शोकभरानें दोषोनी कितींतें "

क्षमा:--

किशोर वदला--" मी अपराधी, क्षमा करावी मातें
कोण गुरुजनाविण क्षाळिल घडलेल्या दोषातें
कृपा-जान्हवी अपुली तिजहुन थोर काय मद्दोष ?
गंगातीरीं पापें विरतीं घडलेलीं निःशेष
या कुलदेवासमक्ष अपुल्या चरणीं ठेवुन हात
निश्चित कथितों संतत राहिन या पुढतीं आज्ञेंत.

कंठ दाटला, किती सांचले माणिक मोतीं नेत्रीं
गळूं न दिधले वत्सलतेनें सांवरिलें निजवस्त्रीं

## अजितसिंहाचें आव्हाहनः-

तो क्षण सरला, तोंच विभुपुढें अजितसिंहजी आले
नृपतिपदावरि खड्ग ठेवुनी विनीत चरणीं झाले
जनकामागुन प्रणती घडली भूपाला विजयाची
स्वराज्यनिष्ठा गहिवरली तैं सुक्तावत शाखेची
“ मेवाडेश्वर! राजद्रोही–स्पर्श पदाला झाला
अजित ह्मणाले--‘ जिवंत उरलों साहुन या दोषाला!
सुक्तावत हे सिसोदियांचे कुलबंधू विख्यात
कलंक अमुचा निरवो आजी एकलिंगजी नाथ
आज कुळाला उजाळिन किंवा ठेविन येथें प्राण ”
अजितांचा हृत्सागर डहुळे, उरलें त्यांस न भान
मान वळवुनी ह्मणे ‘ पुढें या सबलसिंहजी आतां
या शिवलिंगीं हात ठेवुनी कथा पुन्हां ती वार्ता
फितुर जहालों देसोरीच्या रणीं अह्मी यवनांशीं
इथें ऐकवा सत्य एकदां तें गिरिजानाथाशीं
आह्मासंगें तुह्मीहि होतां, काय पाहिलें बोला
तुह्मीच आधीं पाठ फिरविली, वाट दिली शत्रूला

फितुरीचा उलगडा:—

चकित पहाती सबलसिंहजीकडे प्रमुख सरदार
मलीन दिसला मंडनगडच्या गळ्यांतला तो हार
पर्णहीन तो कुटज-वृक्ष, कीं तडाग नीरविहीन
वक्षावरि हनु घेइ विसावा गेले ओठ सुकून
अंधारांतील किरणापरि तैं अचल येइ सामोरा
लोकदृष्टि मधुपावलि वळली त्याजकडेच अधीरा
पित्यास वंदी, प्रभुला प्रार्थी म्हणे भ्रमाचि हा सारा
दिलीरखानें वाहविला हा रणिं फितुराचा वारा
'मित्र आमुचे, मिळा आम्हाला' हा अजितांस लखोटा
लिहून अमुच्या करीं पाडिला परि अंतरिचा खोटा
अमुच्या नांवें असेंच लिहिलें होतें पत्र तयानें
तें अजितांच्या करीं मिळालें नाहीं दुर्दैवानें !
जनकाच्या अतिशोकें वेडा फकीर आला कोणी
देउनि गेला 'मित्र–पत्रिका सांभाळा' बोलोनी
म्यां दाखविली पित्यास, त्यांना खरेंच परि वाटेना
शिक्षेला मी पात्र असो, कुलवैर मला साहेना
या फकिराचा जनक खरोखर यवनचमूंतिल हेर
अजितांना हा भेटु न शकला मधेंच झाला ठार

निर्दोषी अजितसिंहः-

अभ्रामधुनी चंद्र निघावा नेत्र तयें सुखवावें
पावकांतुनी कनक निघावें कांतीनें शोभावें
घर्षणयोगें चंदन तरुचा सुगंध कीं पसरावा
अजितांचा गुणमहिमा तैसा कां न तिथें विलसावा ?
कष्ट साहिले, शील रक्षिलें ज्या लोकश्रेष्ठांनीं
तच्चारितांच्या माला रचिल्या सरस्वती-भक्तांनीं
आपत्कालीं दुःखें कष्टें सज्जन भोगिति जेव्हां
न कळत जाती कीर्तिमंदिरीं पाउल पाउल तेव्हां
जी विषमास्थिति प्रकटित असते रूप आपुलें घोर
दैवी--घटना रम्य तदुदरामधून ये बाहेर
संकटकाळीं धीर त्यजिति न धैर्यवंत म्हणुनीच
उपहासाचे देताती जरि डाग अधम जन नीच
उदेपुराधिप जयसिंहांचे प्रेमोद्गार निघाले
पारिजातकावरी विकसले नव कुसुमांचे झेले
अजितसिंहजी ! घोर जहाला तुम्हाविषयिं अन्याय
तुमचीं दुःखें स्मरणीं येतां हृदय दुभंगुनि जाय
कंठिं वागवा, तोडुनि फेका रत्नाला विजनांत
न्यून होइना तेज तयाचें नैसर्गिक अणुमात्र

रामपूरचें शौर्य जणो हें खड्ग न खालीं ठेवा
कटीस तुमच्या बांधुन देतों हा विभवाचा ठेवा

**सबलसिंहाचा राजसंन्यास:—**

अजित-कटीला चढवित असतां खड्गाचा शृंगार
राणाजीच्या चरणिं वाहिली सबलांनीं तरवार
नृपें तत्क्षणीं अजित-करीं कर दिला सबलसिंहाचा
म्हणे-" असो दृढ-भाव यापुढें चोंडावत--सूक्तांचा
मंडनगडचा भूप बोलला सेवुनि वैराग्याला
वाहियलें हें खड्ग पदावरि, बांधा तें अचलाला
गढ सोडोनी इकडे आलों निश्चय तेव्हां झाला
क्षमा असावी, पदरीं घ्यावें सांभाळुनि अचलाला
आग्रह झाला तरी न वळलें अनुतापी मन त्यांचें
अचल-कटीला भूषण चढलें झगमगत्या खड्गाचें
त्या शूराच्या शिरोत्रणाला पुशी महिप शेल्यानें
म्हणे- ' उदारा ! अपूर्ण वाटे गौरव मच्चित्तानें '

**पाणिग्रहण:—**

अजितसिंहजी हंसुन म्हणाले आज्ञा द्या या वेळीं
कर्तव्याची करितों पूर्ती समुचित मंगल-कालीं
इतुकें बोलुन बाहिर गेले अजित पुन्हां जों आले
उत्सुकतेला गमलें जणु कीं प्रहर किती तरि गेले

पुढें जनक तो, मागें नंदिनि मंदगतीनें आली
कुमारिकेच्या दिसली लज्जा विराजलेली गालीं
नेत्ररंजिनी हृदयनंदिनी वत्सलतेची बाला
जनकामागें झांकित आली अपुल्या रम्य मुखाला
देव, भूप, निजमित्र, आप्तजन समक्ष या सकलांच्या
तात देतसे कर दुहितेचा करांत तो अचलाच्या
भरून आला कंठ, पित्याची माया साश्रु जहाली
सहज मुखांतुनि प्रेमळतेचीं वचनें बाहिर आलीं
"वीर-कुमारा ! त्वांच रक्षिलें पुष्प, तुला तें अर्पी
वंशभूषणा ! सुखवुनि हिजला वंद्यजनां संतर्पी
कारागेहीं प्रवेश केला सोडविलें पुत्राला
कलंक धुतला मोलच नाहीं तुझिया उपकाराला
राणाजींना सुविदित होती शौर्यकृती अचलाची
कोंदणांत ती हिरकणि बसली, मान डोलली त्यांची
श्वशुर-जनक-विभुचरणीं लवला अचसिंह गुणशाली
कल्याणप्रद प्रभुवचनांची वृष्टि तयावर झाली
आनंदाच्या ऊर्मी उठल्या बालेच्या हृदयांत
सन्निध होते प्रियजन तरिही कांपत होता हात
एकदांच जों दृष्टि तियेची दयित-दृष्टिला भेटे
जणु अमृताची वृष्टि जहाली परस्परांना वाटे

प्रिय–प्रियांच्या सफलाकांक्षा होती ज्या समयांत
सुखमय तो क्षण अमरचि असतो त्यांच्या आयुष्यांत
हिमालयाचीं विशाल शिखरें रवितेजें नटलेलीं
प्रणयी-हृदयें तत्सम जाणा प्रेमानें सजलेलीं

लग्नः–

लग्न-सोहळा उदेपुराच्या राजप्रासादांत
राणाजींनीं स्वतांच केला न्यून काय तरि त्यांत
जेथें स्फुरलें बाहु भटांचें ऐकुनि संगर-वाद्यें
तिथें नंदिनी-विवाहवाद्यें वाजति मंगल नादें
भूपालानें पूर्ववैभवीं स्थापियलें अजितांना
वनवासाहुनि रामचि आले हा आनंद जनांना
सौंदर्याचें मंडन केवळ नंदिनिच्या रूपानें--
विराजलें तें ' मंडन गड ' हा सार्थ गमे नामानें
गिरिवनवासिनि नन्दिनि झाली मन्डनगडची राणी
जनां रिझविती भाग्यवतीच्या भाग्याचीं नव गाणीं

समाप्त.

# काव्यकिरण–माला.

( सं० व प्र०——मि. का. भोरटके )

अगाऊ त्रैवार्षिक वर्गणी ५॥ रु.

या मालेंतून आजवर बाहेर पडलेलें वाङ्मय काव्यरसिकांस आनंद देणारें तर आहेच पण मराठी काव्याचा काळजीपूर्वक अभ्यास करणाऱ्यांस तें अत्यंत उपयुक्तही आहे. सामाजिक, ऐतिहासिक सुंदर खंडकाव्यें, चित्रकाव्यें, स्फुटकविता, रसाळ अभंग, मार्मिक निबंध हिंदी काव्याचीं भाषांतरें अशा विविध प्रकारांनीं वरील वाङ्मयास शोभा आली असून त्यायोगानें मराठी भाषेंत महत्वाची भर पडली आहे. महाराष्ट्रीयांनीं मालेस आश्रय देऊन असें वाङ्मय संग्रहीं ठेवणें जरूर आहे. साडेपांच रुपये वर्गणींतून बारा आणे प्रवेश फी वजा जातां बाकीच्या पावणे पांच रुपयांची फेड दर तीन महिन्यांनीं एक याप्रमाणें पुस्तकरूपानें केली जाईल. पुस्तकांची किंमत चार ते आठ आणे पर्यंत असते. वर्गणीदारांस पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळतें मालेंतून आतांपर्यंत पुढील पुस्तकें नियमितपणें प्रकाशित झालीं आहेत

१ महाराणा प्रतापसिंह ( खंडकाव्य ) … … ०८
२ मान्यांची यमुना ( ,, ) … … ०६
३ चंडीचतक ( चित्र काव्य संग्रह ) … … ०१२
४ कविता-वनिता( वनिता विषयक सुंदर कवितांचा संग्रह) ०८
५ कुमुद्वती ( स्फुट कविता ) … … ०८
६ शिवप्रताप (भूषण कवीच्या शिवाबावनीचे भाषांतर) ०८
७ मराठी कवि-विरुद्ध प्रो० पटवर्धन ( निबंध ) ०६
८ अभंगमाला ( आवृत्ति दुसरी ) … … ०७
९ नन्दिनी ( सचित्र खंडकाव्य ) … … ०८
१० शिवराज-भूषण ( छापत आहे. )

हीं सर्व पुस्तकें श्री. कवि तिवारी ह्यांचीं आहेत.

मि० का० भोरटके

जळगांव पूर्व खानदेश.

# तिवारींचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| * | १ काव्यकुसुमांजली ( छापत आहे ) ... | ऽ१० |
| | २ काव्यरत्नमाला ... ... ... | २॥ |
| | ३ मनोहरलीला ( खंडकाव्य ) ... ... | ऽ६ |
| * | ४ प्रसन्नराधा ,, ... ... | ऽ६ |
| * | ५ महाराणा प्रतापसिंह (खंडकाव्य, सचित्र २ री आवृत्ति) | ऽ१० |
| | ६ मान्यांची यमुना ,, ... ... | ऽ६ |
| | ७ अभंगमाला (आवृत्ति दुसरी) ... ... | ऽ७ |
| * | ८ कविता--वनिता ... ... ... | ऽ८ |
| × | ९ शिवप्रताप ... ... ... | ऽ८ |
| × | १० कुमुद्वती ... ... ... | ऽ८ |
| | ११ मराठ्यांचीं संग्रामगीतें (सचित्र आवृत्ति ६ वी) | १ऽ= |
| | १२ झांशीची संग्रामदेवता ( आवृति तिसरी ) | ऽ१० |
| * | १३ राधामाधव (सचित्र खंडकाव्य) ... ... | ऽ१० |
| | १४ चंडीशतक (चित्रबंधासह) ... ... | ऽ१२ |
| | १५ मराठी कवि विरुद्ध प्रो. वा. व. पटवर्धन बी. ए. | ऽ३ |
| | १६ नंदिनी ( सचित्र खंडकाव्य ) ... ... | ऽ८ |

पहिलीं दहा पुस्तकें मुंबई विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत. आणि ह्याच दहा पुस्तकांस महाराष्ट्रग्रंथोत्तेजक मंडळ इंदूर यासंस्थेनें बक्षिसें दिलीं आहेत.

१।२।५।६।७।९।१० व १५ ह्यानंबरचीं बुकें नागपूर विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत.

* ह्या पुस्तकांस दाक्षिणाप्राइज कमेटीनें बक्षिसें दिलीं आहेत. व × ह्या पुस्तकांस शिफारस पत्रें दिलीं आहेत.

सर्व पुस्तकें मिळण्याचे पत्तेः—

१. दु॰ आ॰ तिवारी, जळगांव पू. खा-

२ परचुरे आणि मंडळी, माधवबाग मुंबई नं. ४

३ दत्तात्रय कंपनी – जळगांव, पू॰ खा॰

वा. क. ४२४९

REFBK-0004249
REFBK-0004249